

बालवाङ्मय माला.

पुष्प तिसरें.

वैभवशाली विजयनगर.

लेखक—
यशवंत अमृत ठोंबरे, बी. ए.

बालवाङ्मयमाला—पुष्प तिसरें.

वैभवशाली विजयनगर.

लेखक

यशवंत अमृत ठोंबरे, बी. ए.



बालवाङ्मयमाला—पुणें शहर.

किंमत १० आणे.

हें पुस्तक पुणें, पेठ शनवार, घ. नं. ५७० येथें **अनंत सखाराम गोखले**
यांनीं आपल्या '**विजय**' छापखान्यांत छापिलें
व
यशवंत अमृत ठोंबरे, यांनीं ३३१ सदाशिव पेठ, पुणें
येथें प्रसिद्ध केलें.

पुस्तकें मिळण्याचें ठिकाणः—

बालवाङ्मयप्रसारक मंडळ,
३३१ सदाशिव पेठ, पुणें

प्रतावना.

गेला तो नृप, ते प्रधान अवघे, ते पंडितांची सभा।
गेली ते नगरी, तशा शशिमुखी, त्या तप्तहेमप्रभा॥
गेला तो नृपपुत्र, त्या शुभकथा, स्यां देखिलें सर्व जें।
तें जेणें स्मरणास योग्य रचिलें, कालासि त्या वंदिजे॥

—वामनपंडित.

प्राचीन काळीं आपल्या भरतखंडामध्यें हिंदु लोकांचीं मोठमोठीं वैभवशाली साम्राज्यें होऊन गेलीं. शिवाजी महाराजांनीं स्थापलेलें मराठेशाहीचें साम्राज्य, हें यांपैकीं शेवटलें होय. मराठेशाहीच्या संस्थापकानें मराठी राज्याचा पाया घालण्यास सुरुवात केली, त्याच्या सुमारें शंभर वर्षांपूर्वीं दक्षिणेमध्यें आणखी एक बलाढ्य साम्राज्य अस्तित्वांत होतें. हें साम्राज्य विजयनगरचें होय. इ. स. १५६५ मध्यें तालिकोटच्या भयंकर लढाईनें या साम्राज्याचा शेवट झाला. या साम्राज्याची इ. स. १३३५ त स्थापना झाली, तेव्हांपासून तें १५६५ पर्यंत, म्हणजे सुमारें दोनशें वर्षें-पावेतों, या साम्राज्यानें मुसलमानी स्वाऱ्यांची लाट आडवून धरण्यांत हिंदुत्वाची फार महत्त्वाची कामगिरी बजावली. या साम्राज्याची हकिकत फारच त्रोटक रीतीनें उपलब्ध आहे. पण, ती आहे तेव-ढ्यावरून देखील, या साम्राज्याचा इतिहास फारच देदीप्यमान् व स्फूर्तिजनक होऊन गेला, असें वाटूं लागतें. या साम्राज्याचें वैभव पाहून, परदेशी प्रवासी आणि परराष्ट्रीय वकील अगदीं थक्क होऊन जात, आणि ते त्याचा मोठ्या गौरवपूर्ण भाषेनें उल्लेख करीत.

या साम्राज्याचा इतिहास स्यूएल नांवाच्या एका ग्रंथकारानें संक-लित केला आहे. विजयनगरच्या प्राचीन वैभवाची स्मृति आज आप-

त्यांमधून पार बुजून गेली आहे, असें वाटल्यावरून त्यानें आपल्या पुस्तकास "एका विस्मृत साम्राज्याचा इतिहास" असें नांव दिलें. पण सूर्यनारायण राव नांवाच्या एका राष्ट्राभिमानी मद्रासी विद्वानास स्यूएल साहेबांची कोटी सहन न होऊन, त्यानें या विषयावर दुसरें एक पुस्तक रचिलें, आणि विजयनगरची आठवण भारतीयांच्या मनांत सदोदित जागृत राहील हें दाखविण्याकरितां त्यानें आपल्या पुस्तकास "अविस्मरणीय साम्राज्याचा इतिहास" असें नांव दिलें. या दोन पुस्तकांवरून विजयनगरच्या प्राचीन वैभवाची छाप जुजबी रीतीनें इतिहास वाचणाराच्या मनावर देखील बसते. विजयनगरच्या गतवैभवाची आठवण कै. हरि नारायण आपटे यांनीं आपल्या 'वज्राघात' नांवाच्या कादंबरीनें मराठी वाचकांस यापूर्वींच करून दिली आहे. तीच हकीगत इतिहासाच्या रूपानें मीं माझ्या बाल-वाचकांच्या कानांवर घालण्याचा विचार केला आहे.

बालवाङ्मयमाला.

आपल्या मराठी भाषेमध्यें खास मुलांच्या उपयोगासाठीं लिहिलेलीं पुस्तकें आधींच थोडीं आणि त्यांत शास्त्रीय विषयांवर लिहिलेलीं पुस्तकें तर अगदींच विरळा. फार तर काय, पण इंद्रियविज्ञानशास्त्रासारख्या आपल्या आरोग्यासाठीं अत्यंत आवश्यक असणाऱ्या, किंवा वनस्पतिशास्त्र अथवा प्राणिशास्त्र यांसारख्या अत्यंत मनोरंजक व कुतूहलोत्पादक विषयांवर मुलांस समजेल इतक्या सोप्या भाषेंत लिहिलेलें भरपूर माहितीचें एक तरी पुस्तक असेल कीं नाहीं, याची शंकाच वाटते. बालोपयोगी शास्त्रीय वाङ्मयाची ही उणीव भरून काढण्यासाठीं ही माला मुद्दाम सुरू करण्यांत आली आहे; व तिजमध्यें वनस्पतिशास्त्र, प्राणिशास्त्र, ज्योतिर्विज्ञान, इंद्रियविज्ञान यांसारख्या शास्त्रीय विषयांवर विशेषेंकरून भर देण्यांत येईल. पण रुचिवैचित्र्यासाठीं प्रसंगानुरोधानें राष्ट्रीयभावनोद्दीपक इतिहास, थोर विभूतींचीं चरित्रें, प्रवासवर्णनें, स्थलवर्णनें, इत्यादि विषयांचाहि तिजमध्यें समावेश करण्यांत येईल.

या ठिकाणीं ' बाल ' या शब्दाचा अर्थ मात्र स्पष्ट केला पाहिजे. बाल म्हणजे अत्यंत लहान मुलें व मुली हा या शब्दाचा अर्थ या ठिकाणीं घेतलेला नसून, सुमारें बारापासून सोळा वर्षें ही या मालेसाठीं मुलांची वयोमर्यादा ठरविण्यांत आली आहे. आणि "बालो षोडशवार्षिकः" या उक्तीप्रमाणें बालांची वयोमर्यादा थेट सोळा वर्षांपावेतों पोंचत असल्यामुळें " बालवाङ्मयमाला " हेंच नांव या मालेसाठीं पसंत केलें आहे. या मालेंतील पुस्तकें वरील मर्यादेंतील मुलांस विशेष उपयुक्त होतील. पण त्यांहूनहि लहान असलेल्या मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी ज्या आईबापांवर किंवा शिक्षकवर्गावर असते, त्यांस लहान मुलांच्या शिक्षणाची दिशा आंखण्यासाठीं या पुस्तकांची फार मदत होईल. शिवाय हीं पुस्तकें मुलांचें मन वेधूं शकेल, इतक्या सोप्या व आकर्षक भाषेंत लिहिलीं अस-

त्यामुळें, शास्त्रीय विषयांसंबंधीं आपलें ज्ञान वाढविण्याची इच्छा धरणाऱ्या ज्ञानेच्छु स्त्रीपुरुषांस तीं उपयोगीं होतील, हें निराळें सांगावयास नको.

हा आमचा प्रयत्न यशस्वी झाल्यास राष्ट्रीय शिक्षणाचा प्रश्न बराचसा सुटल्यासारखा होईल. कारण, मातृभाषेंतून शिक्षण देणें, हें राष्ट्रीय शिक्षणाचें एक प्रमुख अंग आहे. एखादा विषय स्वभाषेंतून जसा समजूं शकतो तसा तो परभाषेंतून समजणें शक्य नसतें. आजपावेतों आपल्या तरुण पिढीस परभाषेंतून शिक्षण दिलें गेल्यामुळें, तिची शारीरिक व बौद्धिक वाढ खुंटविण्याचें भयंकर पातक आपल्या हातून घडलें, ही गोष्ट आतां सर्वमान्य झाली असून, निदान प्रवेशपरीक्षेपर्यंत तरी सर्व विषय शक्य तोंपावेतों मातृभाषेंतूनच शिकविले जावेत, अशी खटपट सध्यां चालू आहे. या प्रयत्नाच्या मार्गांतील मुख्य अडचण म्हणजे निरनिराळ्या विषयांवरील पुस्तकांचा आपल्या भाषेंत असलेला अभाव, ही होय. सदहू मालेंतील पुस्तकांमुळें ही उणीव अंशतः तरी दूर होईल, अशी संपादकांस आशा वाटत आहे.

लहान मुलांमध्यें शास्त्रीय विषयांबद्दल आवड उत्पन्न करण्यासाठीं, त्यांच्या मनःस्थितीस पटतील अशीं पुस्तकें रचण्याची व त्यांसाठीं मुद्दाम शास्त्रीय विषयांवर व्याख्यानें देवविण्याची वहिवाट पाश्चात्य देशांत रूढ झाली आहे. याच धर्तीवर सरळ व सोप्या पण चित्ताकर्षक भाषेंत पुस्तकें रचण्याचा हा प्रयत्न आहे. आणि पुस्तकांचे विषय अशा रीतीनें तोडण्यांत आले आहेत कीं, एकाच विषयावरील या मालेंतून निघालेलीं पुस्तकें एकत्र केल्यास, त्या विषयावर संपूर्ण माहितीचें असें एक पुस्तक तयार व्हावें. अशा रीतीनें महाराष्ट्रीय पालकवर्गावर विशेष खर्चाचा बोजा न लादतां, थोडक्या काळांत मुलांसाठीं छोटेखानी ज्ञानकोश तयार व्हावा, आणि त्यांतून त्यांच्या ज्ञानविषयक गरजा भागाव्या, अशी योजना करण्यांत आली आहे. अर्थात् हें काम लोकाश्रयावांचून पार पडणें अशक्य आहे.

या मालेंतील पुस्तकें दर वर्षास चार याप्रमाणें निघतील, आणि तूर्त तीं हप्त्याहप्त्यानें न निघतां दर वर्षीं दिवाळीच्या सुमारास एकाच वेळीं

प्रसिद्ध करण्यांत येतील. या मालेंतून या वर्षी खालील पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेतः—

(१) **हवेंतील चमत्कार.** लेखक, विष्णु अमृत ठोंबरे, बी. ए., एल् एल्. बी.

(२) **तेजोनिधि सूर्य.** लेखक, सर्वोत्तम वासुदेव देशपांडे, बी. ए.


(३) **वैभवशाली विजयनगर.** लेखक, यशवंत अमृत ठोंबरे, बी.ए.

(४) **शरीरांतील आश्चर्यकारक भाता.** लेखक, विष्णु अमृत ठोंबरे.

या पुस्तकांत चित्रांचा भरपूर उपयोग केला असून, विजयनगरच्या पुस्तकास एक विषयसूचक नकाशा जोडला आहे. दरएक पुस्तक अजमासें पाउणशें पानांचें (क्राउन आकाराचीं) असून प्रत्येक पुस्तकाची किंमत दहा आणे ठेवली आहे. बाहेरगांवच्या गिऱ्हाइकांस याशिवाय टपालखर्च निराळा पडेल.

३३१ सदाशिव पेठ, पुणें.
माहे डिसेंबर, १९२१.

बालवाङ्मयप्रसारकमंडळ.



विजयनगरचें साम्राज्य.

वैभवशाली विजयनगर.

प्रकरण पहिलें.

साम्राज्याची स्थापना.

तुंगभद्रा नदीच्या आसमंतात् असलेल्या प्रदेशांत पुरातन काळापासून अनेगुंदी नांवाचें एक संस्थान होतें. याच संस्थानापासून विजयनगरच्या भावी साम्राज्याचा उत्कर्ष व्हावयाचा असल्यामुळें, प्रस्तुत इतिहासाच्या दृष्टीनें त्यास एक प्रकारचें महत्त्व आलें आहे. रामायणांतील वालीसुग्रीवादिकांची राजधानी किष्किंधानगरी आणि प्रभु रामचंद्राच्या विहारानें पवित्र झालेलें पंपासरोवर, हीं देखील तुंगभद्रेच्या कांठीं याच राज्याच्या टापूंत त्या वेळीं मोडत असल्यामुळें, पौराणिक इतिहासाच्या दृष्टीनें देखील त्याचें फार महत्त्व आहे. तुंगभद्रेच्या दक्षिण तीरावर अजून देखील हाडकासारख्या पांढुरक्या पदार्थाची एक मोठी रास दाखविण्यांत येत असून, रामाच्या बाणानें दग्ध झालेल्या वालीच्या प्रचंड शरीरापासून ती तयार झाली, असें सांगण्यांत येतें. तेथें जाणारा प्रत्येक प्रवाशी या रक्षेचा थोडकासा भाग उकरून काढून, आश्चर्यकारक गोष्टीचा नमुना म्हणून आपल्या बरोबर घेऊन जात असतो आणि यावरून प्राची-

नकाळीं ही रास केवढी मोठी असावी याची कल्पना करितां येते.

अनेगुंदी संस्थानची राजधानी अनेगुंदी नांवाच्याच एका शहरांत असे. हें शहर मजबूत व माऱ्याचें ठिकाण असल्यामुळें तेथें तत्कालीन राजांनीं एक किल्ला बांधला होता. हा किल्ला तुंगभद्रेच्या उत्तर किनाऱ्यावर असून, त्या वेळच्या राजांनीं बांधलेल्या तटबंदीच्या भिंती तेथें अजून देखील दिसून येतात. किल्ल्याच्या पूर्वेस आणि दक्षिणेस असलेला तुंगभद्रेचा विस्तृत प्रवाह आणि उत्तरेस व पश्चिमेस पसरलेल्या डोंगरांच्या ओळी, यांमुळें या किल्ल्यास साहजिकपणेंच एक प्रकारचें अभेद्यत्व प्राप्त झालें होतें; आणि या निसर्गनिर्मित मजबुतींत भर टाकण्यासाठीं अनेगुंदीच्या राजांनीं त्याची उत्तम प्रकारें डागडुजी केली होती. या अभेद्य दुर्गामध्यें आपला कोष सुरक्षित ठेवून, अनेगुंदीचे राज्यकर्ते दूरदूरच्या मुलुखगिऱ्या करण्यासाठीं जात, आणि संकटाच्या वेळीं तेथें आश्रयासाठीं परत येत.

अनेगुंदी हें अजून देखील एक लहान संस्थान असून, तेथें जुन्या राजघराण्यांतील एक राजपुरुष ब्रिटिश सरकारचा मांडलिक या नात्यानें राज्य करीत असतो. या राजाच्या पदरीं विजयनगरच्या प्राचीन राजांची वंशावळ दाखविणारा एक कागद उपलब्ध आहे. त्यावरून असें दिसून येतें कीं, विजयनगरच्या साम्राज्याची स्थापना इ. स. १३३५ मध्यें होण्यापूर्वीं जो दोनशें वर्षांचा इतिहास लागतो, त्या वेळीं अनेगुंदीच्या गादीवर नंद, चालुक्य, विजयध्वज, इत्यादि मोठे शूर व पराक्रमी राजे होऊन गेले; आणि त्यांनीं मोठमोठ्या मुलुखगिऱ्या करून राज्याचा विस्तार वाढवून आणि कोषामध्यें अगणित संपत्ति जमवून मोठी कीर्ति संपादन केली होती. या घराण्यांतील शेवटचा राजपुरुष जंबुकेश्वर महाराज हा अनेगुंदी येथें राज्य करीत असतां त्याजवर इ.स. १३३४ त महंमद तुघलकाची स्वारी झाली. विजयनगरच्या साम्राज्याचा उदय होण्यास हीच स्वारी कारणीभूत झाली असल्या-

मुळें, या स्वारीविषयीं आपणांस अंमळ विस्तारानें विचार केला पाहिजे.

इ. स. १२९४ त अल्लाउद्दीन खिलजी यानें दक्षिणहिंदुस्थानचा दरवाजा देवगिरीवर स्वारी करून मुसलमानांस खुला करून दिला. पुढें पंधरा वर्षांनीं त्याचा सेनापति मलिककाफर हा दक्षिणेंत तीन वेळ स्वारी करून आला. त्याची अखेरची स्वारी इ. स. १३१० मध्यें घडली व या वेळीं तर त्यानें थेट कन्याकुमारी-पावेतों मुलूख उध्वस्त करून आपल्या विजयाचा झेंडा रोंवण्याकरितां तेथें एक मशीद बांधविली. यानंतर दिल्लीचा बादशहा अल्लाउद्दीन हा लवकरच मरण पावला आणि तेथें अनेक राज्यक्रांत्या व घडामोडी होण्यास सुरुवात झाली. तेथें जी बेबंदशाही उत्पन्न झाली, तिजमुळें दाक्षिणेंतील कारभाराकडे फारसें लक्ष देण्यास दिल्लीच्या राजांस फावलें नसावें असें दिसतें. पण इ. स. १३२१ मध्यें तुघलक घराणें दिल्लीच्या सिंहासनावर आल्या-पासून ही सर्व स्थिति पालटली. या घराण्यांतील दुसरा बादशहा महंमद तुघलक हा फार शूर व पराक्रमी पुरुष असून आपल्या बापाच्या कारकीर्दींत वरंगूळचें हिंदु राज्य रसातळास नेण्यांत त्यानें मोठी महत्त्वाची कामगिरी बजावली होती. पण तो जितका शूर आणि पराक्रमी, तितकाच विक्षिप्त व क्रूर स्वभावाचा होता. एके दिवशीं खोलीचे दरवाजे बंद करून तो पोशाख करीत असतांना, सूर्याचा एक किरण खोलींत डोकावतांना त्यास दिसला. त्यावरून त्याची मर्जी इतकी खप्पा झाली कीं, त्यानें आपल्या सैन्यास लागलेंच सूर्या-वर चाल करून जाण्यास हुकूम सोडला. सैन्य कूच करूं लागलें, तेव्हां इतका धुराळा उडाला कीं, सूर्य दिसेनासा झाला आणि " तो तुम्हांस भिऊन पळून गेला " अशी त्याच्या सरदारांनीं त्याची समजूत काढली, तेव्हां कोठें त्याचा राग मावळला.

त्याच्या क्रौर्याविषयीं तर निरनिराळ्या आख्यायिका प्रवाशांनीं

नमूद करून ठेविल्या आहेत; त्यावरून दयेचा लवलेश देखील त्याच्या अंतःकरणांत होता किंवा नाहीं याची शंका वाटते. देहांत शिक्षा तर तो इतक्या बिनदिक्कत सांगत असे कीं, जणूं काय सर्व मानवजातीस निर्वंश करण्याचेंच त्यानें योजिलें होतें. त्याच्या हुकुमावरून वध करण्यांत आलेल्या माणसाचें प्रेत दिसलें नाहीं असा प्रसंग फार विरळा. त्याच्या राजवाड्यासमोर बेड्या घालून रोज शेकडों माणसांस पकडून आणण्यांत येत असे. त्यांपैकीं कित्येकांस देहांत शिक्षा होऊन, बाकीच्यांस बेदम मार मिळत असे, किंवा इतर प्रकारें तरी त्यांचे हालहाल होत. या क्रूर बादशहाची स्वारी दक्षिणेवर होण्यास कोणतें कारण झालें तें पाहूं.

महंमद तुघलकास बहाउद्दीन नांवाचा एक पुतण्या होता. त्यावर बादशहाची कांहीं कारणावरून नामर्जी झाल्यामुळें, आपल्या क्रूर चुलत्याच्या क्रोधापासून स्वतःचा बचाव करण्याकरितां, बहाउद्दीन हा विंध्य पर्वताच्या दक्षिणेस असलेल्या संस्थानांतून आश्रय मागत हिंडूं लागला. तो अशा रीतीनें हिंडत असतां, त्यानें अनेगुंदीच्या राजाचा आश्रय मागितला, आणि शरणागतास आश्रय देण्याच्या हेतूनें अनेगुंदीचा राजा जंबुकेश्वर यानें त्याची विनंति तत्काल मान्य केली. पण आपल्या प्रत्यक्ष वैऱ्यास एखाद्या हिंदु राजानें आश्रय द्यावा हें महंमद तुघलकासारख्या मानी बादशहास कसें खपेल ? त्यानें लागलाच आपल्या सैन्याचा तळ हालविला, आणि थोडक्या वेळांत आपल्या अजिंक्य सैन्यासहवर्तमान तो अनेगुंदी किल्ल्यासमोर येऊन पोहोंचला.

या वेळीं अनेगुंदीच्या राजाजवळ सुमारें ५०,००० सैन्य होतें. पण महंमद तुघलकाच्या अफाट सेनेसमोर आपला निभाव लागणार नाहीं असें पाहून, त्यानें निवडक ५००० सैन्य घेऊन अनेगुंदीच्या किल्ल्याचा आश्रय घेतला. या किल्ल्यास बादशाही फौजेचा चोहोंकडून गराडा

पडल्यामुळें आंतील सैन्याची लवकरच उपासमार होऊं लागली. या वेळीं जंबुकेश्वरानें आपल्या शौर्याच्या पूर्व परंपरेस साजेल असेंच वर्तन केलें. किल्ला सर करण्याचा, आणि आंतील सर्व लोकांची कत्तल करण्याचा, दिल्लीपतीचा निश्चय झालेला पाहून त्यानें आपल्या सर्व लोकांस एकत्र बोलावून त्यांजसमोर मोठें प्रोत्साहनपर भाषण केलें; आणि आपलें बाकीचें राज्य शत्रूच्या यापूर्वींच ताब्यांत गेलें असल्यामुळें, शत्रूशीं लढतलढत मरणें हेंच आपणांस कसें उचित आहे, हें त्यानें त्यांस समजावून सांगितलें. यानंतर, आपलीं बायकापोरें शत्रूच्या तावडींत सांपडूं नयेत, म्हणून आंतील लोकांनीं स्वहस्तानेंच त्यांची कत्तल केली; आणि शत्रूवर चालून जाऊन ते सर्व धारातीर्थीं पतन पावले. या लढाईंत बादशाही सैन्यानें सहा माणसांस कैद केलें. त्यांमध्यें अनेगुंदीच्या राजाचा प्रधान, आणि विजयनगरच्या वैभवशाली साम्राज्याचा संस्थापक, हरिहरदेव हा एक होता.

अनेगुंदीचा किल्ला सर झाल्यानंतर महंमद तुघलकानें कांहीं दिवस लुटालूट करण्यांत आणि अन्य रीतीनें जिंकलेल्या प्रांताचा सूड घेण्यांत घालविले; आणि नंतर आपल्या इतर प्रांतांत बंड झाल्याचें वर्तमान आल्यामुळें, अनेगुंदीच्या किल्ल्याचा उत्तम प्रकारें बंदोबस्त करून, तेथें शिबंदीची आणि अन्नसामुग्रीचीं व्यवस्था करून आणि त्यावर मलिक नायब नांवाचा आपला एक विश्वासू सरदार नेमून, तो दुसरीकडे निघून गेला.

महंमद तुघलकाच्या भीतीनें रानावनांत पळून गेलेले लोक आणि केवळ निरुपायास्तव म्हणून या विधर्मी राज्यकर्त्यांचें स्वामित्व ज्यांस कबूल करावें लागलें होतें असे निरनिराळ्या गांवांतील पुढारी, हे याच गोष्टीची वाट पहात होते. बादशहा आपल्या मुख्य सैन्यासह निघून गेला असें पाहतांच, ठिकठिकाणच्या गांवकऱ्यांनीं बंडाचें निशाण उभारलें; त्यांनीं आपल्या नवीन राजकर्त्यांस कर देण्याचें

नाकारिलें; आणि मध्यवर्ती सत्तेच्या अधिकारास न जुमानतां, ते आप-आपल्या गांवांत अगदीं मुखत्यारीनें वागूं लागले. थोडक्याच काळांत ते इतके धीट झाले कीं, दिल्लीचा सुभेदार मलिक नयाब यास त्याच्या राजधानीमध्यें त्यांनीं गराडा दिला, आणि त्याची दाणावैरण व रसद बंद केली. या सार्वत्रिक बंडापुढें आपला निभाव लागणार नाहीं, असें पाहून, नायब यानें हें वर्तमान बादशहास लिहून कळविलें.

ही बातमी बादशहास पोंचली, तेव्हां त्यानें आपल्या मोठमोठ्या सल्लागारांची सभा बोलाविली, आणि अशा प्रसंगीं काय करणें उचित होईल, हें त्यानें त्यांस विचारिलें. "अनेगुंदीचा प्रांत दिल्लीच्या राजधानीपासून फार दूर असल्यामुळें, त्याच्या बंदोबस्ताचें काम आपणांकडून भागणार नाहीं; यासाठीं अनेगुंदीच्या जुन्या राजघराण्यांतील एखादा माणूस हुडकून काढून, आणि त्याकडून दिल्लीच्या राजाचें स्वामित्व औपचारिकरीत्या कबूल करवून त्याकडे या राज्याची व्यवस्था सोंपवावी," असा सर्वानुमतें विचार ठरला. म्हणून जुन्या राजघराण्यांतील एखादा पुरुष शिल्लक आहे कीं काय, याची चौकशी करण्याकरितां आपल्या बंदिवासांत असलेल्या सहा कैद्यांस राजानें आपल्यासमोर बोलाविलें. पण तपास करून पाहतां, जुन्या घराण्यांतील कोणीच पुरुष शिल्लक नसल्याचें आढळून आल्यामुळें, त्या साही जणांत वृद्ध असलेला आणि अनेगुंदी संस्थानच्या नाशाच्या वेळेस तेथील राज्यांत मुख्य प्रधानाचें काम करीत असलेला हरिहरदेव यासच त्यानें राज्याचा वारसा देण्याचें ठरविलें. लागलीच या कैद्यांची मुक्तता करण्यांत आली; आणि हरिहरदेवास अनेगुंदीचें राज्यपद देण्यांत येऊन, तेथें पूर्वीं कोषाध्यक्ष ऊर्फ खजिनदार असलेल्या माणसास हरिहरदेवाच्या प्रधानकीचा हुद्दा देण्यांत आला आणि नंतर या सर्वांबरोबर मोठें सैन्य रवाना करून त्यांस अनेगुंदी संस्थानचा बंदोबस्त करण्यासाठीं पाठविण्यांत आलें.

थोडक्याच दिवसांत हरिहरदेव हा आपल्या अधिकाऱ्यांसहवर्तमान अनेगुंदी येथें येऊन पोहोंचला. मुसलमानांच्या जुलुमास कंटाळलेल्या हिंदु प्रजेस आपल्या जुन्या राजघराण्यांतील प्रधान राजा होऊन परत आलेला पाहून मोठा आनंद झाला. त्यांनीं मोठमोठे उत्सव व समारंभ करून नवीन राजाविषयीं आपली राजनिष्ठा व्यक्त केली, आणि आपल्या स्वतंत्र बाण्यानें परशत्रूपासून मोठ्या कष्टानें सांभाळलेला मुलुख त्यांनीं आपल्या प्रभूच्या चरणीं अर्पण केला. बादशहानें अनेगुंदी येथें नेमलेला सरदार मलिक नायब हा आपल्या नूतन-प्राप्त सुभेदारीस इतका कंटाळला होता कीं, बादशहाचा हुकूम त्यानें मोठ्या आनंदानें शिरसावंद्य करून आणि अनेगुंदीच्या मुलुखाचें स्वामित्व त्याच्या योग्य अधिकाऱ्याकडे सोंपवून शक्य तितक्या त्वरेनें तो उत्तरेस निघून गेला. अशा रीतीनें अनेगुंदी येथील जुनें राजघराणें नाहींसें होऊन, उणींपुरीं तीन वर्षें निघून गेलीं नाहींत, तोंच तेथें त्याहूनहि अधिक पराक्रमी अशा घराण्याची प्रतिष्ठापना झाली.

प्रकरण दुसरें.

साम्राज्याची वाढ.

—:o:—

हरिहरदेवानें आपली कारकीर्द राज्यांत स्थिरस्थावर करण्यांत आणि राज्याची विसकटलेली घडी पुन्हां जमविण्यांत घालविली. आपल्या अंमलाखालील लोकांची स्थिति समजावून घेण्याकरितां, आणि किल्ल्यांची व्यवस्था पाहण्याकरितां, तो स्वतः गांवोगांव हिंडत असे. ज्या लोकांनीं बंडें केलीं होतीं, त्यांस

त्यानें आपल्या कह्यांत आणलें; आणि आधींच कह्यांत असलेल्या लोकांचा योग्य परामर्श घेऊन त्यानें त्यांचीं गाऱ्हाणीं दूर केलीं; आणि जे देश काबीज करण्याइतकें सैन्य आपणांजवळ नाहीं, असें त्यास दिसून आलें, त्यांचें स्वातंत्र्य त्यानें कबूल केलें. अशा रीतीनें थोडक्याच काळांत लोकांचीं मनें आकर्षून घेऊन, त्यानें त्यांची प्रीति संपादन केली.

हरिहरदेवास अत्यंत शूर व कर्तृत्ववान् असे पांच बंधु होते. त्यांस त्यानें मोठ्या जबाबदारीच्या हुद्यांवर नेमलें. त्यांवर त्याला मोठीं विश्वासाचीं व जोखमीचीं कामें सोंपवितां आलीं. इतकेंच नव्हे, तर नुकत्याच प्राप्त झालेल्या राज्यलक्ष्मीस बळकटी आणण्यासाठीं त्यांचा त्यास फार उपयोग झाला आणि त्याच्या मृत्यूनंतर या सर्व पुरुषांनीं आपल्या पूर्वानुभवानें त्याच्या मृत्यूनें झालेली हानि अल्पप्रयासानें तेव्हांच भरून काढिली. हे सर्व बंधु इतक्या एकजुटीनें वागत असत कीं, महाभारतांतील पांच पांडवांशीं त्यांची तुलना करण्यांत येत असे. हरिहरदेवाच्या मृत्यूनंतर त्याचा तिसरा भाऊ बुक्क हा विजयनगरच्या सिंहासनावर अधिष्ठित झाला आणि पराक्रमी राजा म्हणून त्यानें मोठी कीर्ति संपादन केली. बुक्करायास हरिहरदेवानें आपल्या जिवंतपणींच युवराजपदावर अभिषेक केला होता आणि त्याजकडे मोठ्या महत्त्वाच्या लष्करी कामगिऱ्या सोंपविल्या होत्या. हरिहरदेवास कंप नांवाचा आणखी एक भाऊ होता. त्यानें हरिहरदेवाच्या आज्ञेवरून कडपें व नेलोर हे प्रांत जिंकून मोठें यश संपादन केलें. मरप्पा नांवाच्या त्याच्या आणखी एका भावानें कदंब देश पादाक्रांत केला, आणि म्हैसूरच्या पश्चिमेस असलेल्या चंद्रगुत्ति नांवाच्या प्रांतावर कित्येक वर्षें सुभेदारी केली. बल्लप्पा नांवाचा हरिहरदेवाचा एक जामात होता. त्यास त्यानें दण्डनायक म्हणजे सेनाधिपति या मोठ्या महत्त्वाच्या हुद्यावर नेमलें.

हरिहरदेवाची आणखी एक महत्त्वाची कामगिरी म्हणजे विजयनगर शहरची स्थापना ही होय. या शहरच्या स्थापनेसंबंधीं एक मोठी मौजेची आख्यायिका सांपडते. तुंगभद्रेच्या दक्षिण तीरावर, ज्या ठिकाणीं हल्लीं जुन्या विजयनगर शहरचे अवशेष दिसून येतात, तेथें अनेगुंदी येथील राजांना शिकार करण्यासाठीं एक रान राखून ठेविलें होतें. एके दिवशीं राजा हरिहरदेव हा आपल्या शिकारी कुत्र्यांसह तेथें आला असतांना, त्यास एक ससा दिसला, व लागलीच, राजाचे कुत्रे त्याचा पाठलाग करूं लागले. पण इतक्यांत एक चमत्कार घडला, तो असा. सशाचा पाठलाग चालू असतांना तो एकाएकीं थांबला, आणि पाठमोरा वळून व कुत्र्यांवर चाल करून जाऊन त्यानें त्यांपैकीं एकाचा चावा घेतला. या अनपेक्षित प्रकारानें कुत्रे गांगरून गेले आणि सशांपासून दूर एका ठिकाणीं उभे राहिले.

मोठमोठ्या व्याघ्रसिंहादिकांची शिकार करणाऱ्या आपल्या कुत्र्यांचा सशासारख्या क्षुद्र प्राण्यानें प्रतीकार करावा याचें राजास आश्चर्य वाटून, तो त्याविषयीं विचार करीत चालला असतांना, त्यास तुंगभद्रेच्या कांठावर एक तपस्वी भेटला. त्यास त्यानें हा सर्व वृत्तांत निवेदन केला. हा तपस्वी म्हणजे प्रसिद्ध माधवाचार्य विद्यारण्य हे होत. राजाचें भाषण ऐकून विद्यारण्यांनीं एवढा लोकोत्तर चमत्कार ज्या ठिकाणीं घडून आला, तेथें जाऊन ती जागा पाहण्याचें ठरविलें. जागेची पाहणी केल्यानंतर, त्या ठिकाणीं एखादा किल्ला बांधल्यास तो अजिंक्य व दुर्भेद्य होईल असें दिसून आल्यावरून, त्याच ठिकाणीं राजधानी वसविण्यास आणि किल्ला बांधण्यास त्यांनीं राजास आज्ञा केली; आणि ही राजधानी शत्रूस अजिंक्य होईल, असा त्यांनीं राजास त्या दृष्टांताचा अर्थ सांगितला. राजानें देखील स्वामींच्या आज्ञेस अनुसरून त्याच दिवशीं शहराच्या बांध-

कामास सुरुवात केली. कांहीं दिवसांनीं राजानें शहराभोंवतीं एक कोट बांधविला, आणि या नवीन शहरांत त्यानें आपल्या प्रजेची वस्ती करविली. हेंच शहर भावी इतिहासांत विजयनगरच्या साम्राज्याच्या राजधानीचें ठिकाण म्हणून प्रसिद्धीस आलें. विजयाचा म्हणजे यशाचा कित्येक वर्षें या नगरीशीं संबंध जडल्यामुळें, तिला विजयनगर अशी संज्ञा प्राप्त झाली आहे. विद्यारण्यस्वामींच्या आज्ञेवरून तीं बांधण्यांत आली, म्हणून तिला विद्या नगर असेंहि म्हणत असत.

इ. स. १३४४ मध्यें आणखी एक महत्त्वाची गोष्ट घडून आली. ही गोष्ट म्हणजे मुसलमानांच्या वाढत्या सत्तेचा पाडाव करण्याकरितां, दक्षिणेंतील हिंदु राजांनीं केलेली एकी ही होय. या वेळीं विजयनगरच्या सिंहासनावर हरिहरदेव हा बसला होता किंवा तें त्याचा महान् पराक्रमी भाऊ बुक्क यानें विभूषित केलें होतें, हें सांगणें कठीण आहे. तें कसेंहि असलें, तरी मुसलमानांची सत्ता उलथून पाडण्याच्या कामगिरींत विजयनगरच्या राज्यानें मोठा महत्त्वाचा भाग घेतला, ही गोष्ट निर्विवाद आहे. घ्यासुद्दिन तुघलकाच्या कारकीर्दींत त्याचा पराक्रमी मुलगा अलफखान–पुढें महंमद तुघलक या नांवानें प्रसिद्धीस आलेला–यानें वरंगूळच्या प्राचीन हिंदु राज्याचा नाश केला हें मागें सांगितलें. त्या वेळच्या वेढयांतून बचावलेला एक शूर सरदार म्हणजे हरिहरदेव हा पुढें अनेगुंदीच्या आश्रयास येऊन राहिला, आणि त्याच्याच हातून विजयनगरच्या साम्राज्याची स्थापना झाली. त्या वेळच्या सर्वनाशांतून बचावलेला आणखी एक प्रसिद्ध पुरुष वरंगूळचा युवराज कृष्ण नाईक हा होता. वरंगूळचें राज्य नाश पावल्यानंतर, तो तेथेंच एका ठिकाणीं रहात असे. त्यानें वरंगूळ आणि तेलंगण या प्रांतांतील लोकांसह उठाव करून त्यांचें आधिपत्य स्वीकारण्याचें कबूल केल्यामुळें, विजय-

नगरच्या राजानें मलबार, द्वारसमुद्र, इत्यादि संस्थानांची एकी करून जमा झालेल्या सैन्याचें आधिपत्य कृष्ण नाइकाकडे सोंपविलें. या संयुक्त सैन्यास थोड्याच काळांत मोठें यश आलें; आणि त्यानें पूर्वीं वरंगूळच्या हिंदु राजांच्या ताब्यांत असलेला सर्व मुलूख मुसलमानांच्या कचाटींतून सोडविला; इतकेंच नव्हे, तर दौलताबाद किल्ला खेरीज करून विंध्यपर्वताच्या दक्षिणेस असलेल्या सर्व मुलुखांतून मुसलमानी सैन्याची हाकालपट्टी केली.

वर सांगितल्याप्रमाणें हिंदु सैन्यास प्राप्त झालेला विजय फार वेळ टिकावयाचा नव्हता. इ. स. १३४७ मध्यें कृष्णेच्या उत्तरेस मुसलमानांची आणखी एक मध्यवर्ती सत्ता उत्पन्न झाली. ही सत्ता बहामनी सुलतानांची होय. महंमद तुघलकाच्या कारकिर्दीच्या अखेरीस जी बजबजपुरी माजली, तिचा फायदा घेऊन, दक्षिणेंतील कांहीं मुसलमान सरदारांनीं बंडाचें निशाण उभारलें. या बंडानंतर महंमद तुघलक हा लवकरच मरण पावला व त्याच्या मागाहून त्याच्या इतका तेजस्वी बादशहा दिल्लीच्या गादीवर न आल्यामुळें, याच बंडापासून बहामनी सुलतानांच्या अंमलाची उत्पत्ति झाली.

बहामनी सुलतानांचे विजयनगरच्या हिंदु राजांशीं वारंवार युद्धप्रसंग होत. या युद्धांत कधीं मुसलमानांचीं सैन्यें हिंदूंच्या मुलुखावर चाल करून जात, तर कधीं हिंदूंच्या फौजा मुसलमानी सैनिकांस आपला हात दाखवीत. पण बहामनी व विजयनगर अशा दोन्ही राजांची सत्ता बळकट पायावर उभारली असल्यामुळें, या युद्धांपासून म्हणण्यासारखें असें एकाहि पक्षाचें नुकसान होत नसे. या युद्धप्रसंगांचें एक मुख्य व निरंतरचें कारण म्हणजे या राज्यांच्या दरम्यान असलेला अन्तर्वेदींतील मुलूख! विजयनगर हें राजधानीचें शहर तुंगभद्रेच्या दक्षिण तीरावर वसलें होतें, हें वर सांगितलें. तुंगभद्रा नदी सह्याद्रीच्या उंचवट्याच्या भागांतून निघून पूर्वेकडे

वहात वहात वायव्येकडून येणाऱ्या कृष्णा नदीस जाऊन मिळते. कृष्णा व तुंगभद्रा या दोन नद्यांच्या दरम्यान असलेल्या त्रिकोणाकृति प्रदेशास रायचूर दुआब किंवा रायचूरची अन्तर्वेदी असें नांव आहे. या अन्तर्वेदींतील प्रदेश आणि त्यांत असलेलें मुद्गल व रायचूर हे दोन महत्त्वाचे किल्ले, यांच्या प्राप्तीसाठीं हिंदुमुसलमानांमध्यें अडीचशें वर्षेंपावतों अनेक घनघोर रणकंदनें झालीं. पण त्यांत दोन्ही पक्ष तुल्यबल असल्यामुळें, एकाहि पक्षास निर्विवादपणें अशी विजयश्रीनें केव्हांहि माळ घातली नाहीं. या अन्तर्वेदींत असलेला एकएक दगडाचा गोटा हिंदुमुसलमानांच्या रक्तानें माखलेला असेल, आणि तेथें लढाईंत पतन पावलेल्या लाखों वीरांचीं हाडें जमिनींत मिसळलीं असतील. या दगडाच्या गोटयांस बोलतां आलें असतें, तर त्यांनीं हिंदुमुसलमानांच्या शौर्याचें वर्णन, इतिहासाचीं पुस्तकें करूं शकतात त्यापेक्षां किती तरी चांगल्या रीतीनें केलें असतें.

विजयनगरच्या उत्कर्षाविषयीं सांगतांना एका प्रसिद्ध व्यक्तीचा मोठ्या प्रामुख्यानें उल्लेख केला पाहिजे. ही व्यक्ति माधवाचार्य विद्यारण्य ही होय. कोणत्याहि राज्याची भरभराट होण्यास, तलवार गाजविण्याची शक्ति आणि मुत्सद्दीगिरी असे दोन गुण असावे लागतात. तलवारीच्या जोरावर देश जिंकतां येतात आणि राज्याचा विस्तार वाढवितां येतो; आणि मुत्सद्दीगिरीच्या योगानें तलवारीस वळण लागतें, राज्यांत संघटना होते आणि एकीच्या योगानें उत्पन्न होणारी जी संघशक्ति ती देखील निर्माण करितां येते.या दोन प्रकारच्या गुणांस क्षात्रतेज आणि ब्राह्मतेज अशीं नांवें आहेत. आपल्या जुन्या इतिसांत जीं मोठमोठीं राज्यें होऊन गेलीं, त्यांच्या भरभराटीच्या वेळीं या दोन्ही शक्तींचा सुंदर मिलाफ झालेला दिसून येतो. पहिला बाजीराव हा ब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकर यांच्या मसलतीनें वागत असे.

शिवाजीमहाराज हे रामदासाचे शिष्य होते. त्याचप्रमाणें चंद्रगुप्तास चाणक्य, नंदांस राक्षस, रामचंद्रास वसिष्ठ आणि देवांस बृहस्पति, असे निरनिराळे गुरु होते. सारांश, त्या त्या वेळचे पराक्रमी राजे आपल्या गुरूंशीं योग्य सल्लामसलत करून आपल्या पराक्रमाची दिशा ठरवीत असत. हीच परंपरा विजयनगरच्या संस्थापनेमध्यें चालू राहिल्याचें आपणांस स्पष्टपणें दिसून येतें. श्रीमाधवाचार्य विद्यारण्यांचा विजयनगरच्या उत्कर्षाशीं फार निकट संबंध आहे. विजयनगर येथें राजधानीची स्थापना माधवाचार्यांच्या सांगण्यावरून करण्यांत आली, हें आपण पाहिलें. फार तर काय, पण हरिहर व बुक्क या पराक्रमी बंधूंस या महापुरुषाच्या साहाय्याच्या अभावीं साम्राज्याचा विस्तार थोडक्याशा काळांत करितां आला असता किंवा नाहीं याची शंकाच वाटते. कारण विजयनगरच्या गादीवर त्यांचा वारशाचा असा मुळींच हक्क नव्हता. अशा स्थितींत विद्यारण्यस्वामींचा नैतिक पाठिंबा मिळाल्यामुळें, त्यांस आपली सत्ता लोकांकडून कबूल करवून घेण्यांत मोठी मदत झाली असावी, हें उघड होतें.

विद्यारण्याची राजकीय कामगिरी क्षणभर एकीकडे ठेवली, तरी त्यांची धार्मिक व वाङ्मयात्मक कामगिरी फार उच्च दर्जाची होती. त्यांनीं न्याय, व्याकरण, मीमांसा, धर्मशास्त्र, वैद्यक आणि ज्योतिष या विषयांवर ग्रंथरचना केली. साम्राज्यांतील अधिकाऱ्यांस कायद्याचीं आणि राजनीतीचीं तत्त्वें यांची माहिती देण्यासाठीं त्यांनीं लिहिलेला ग्रंथ पराशरमाधवीय ऊर्फ विद्यारण्यस्मृति या नांवानें प्रसिद्ध आहे. इतक्या विविध विषयावर ग्रंथरचना करण्यांत त्यांचें निरनिराळ्या विषयांवरील असामान्य प्रभुत्व दिसून येतें व त्यांची विद्यारण्य ही पदवी सार्थ होती असें वाटूं लागतें. त्यांच्या वेळेस विशिष्टाद्वैत व द्वैत या दोन मतांचा झगडा चालला होता. विद्यारण्यांनीं वेदान्त-

विषयावर ग्रंथ लिहून अद्वैत मताचें पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न केला. ते बरेच वर्षेंपावेतों श्रृंगेरी मठाच्या गादीवर अधिष्ठित होते.

माधवाचार्यांचा जन्म गरीब पण कुलीन अशा एका ब्राह्मणकुळांत झाला होता. त्यांच्या वडिलांचें नांव मायण असून मातोश्रीचें नांव श्रीमती असें होतें. त्यांस सायण आणि भोगनाथ असे दोन धाकटे भाऊ होते. माधवाचार्य आणि सायाणाचार्य या दोघांनीं एकाच गुरूजवळ संस्कृत विद्येचें अध्ययन केलें आणि ह्या दोघांचीहि विद्वत्तेबद्दल सारखीच ख्याति होती. माधवाचार्यांस ग्रंथलेखनांत सहाजिकपणेंच सायणाचार्यांची मोठी मदत होत असे. त्यांचे कनिष्ठ बंधु भोगनाथ हेहि विद्वान् म्हणून नांवाजलेले असून त्यांना शृंगेरी मठाचे शंकराचार्य होण्याचा मान मिळाला होता.

माधवाचार्यांनीं श्रृंगेरी येथें चतुर्थाश्रमाची दीक्षा घेतल्यानंतर कांहीं वर्षांनीं महंमद तुघलकाची स्वारी होऊन अनेगुंदी येथें अराजकता माजली. अशा राष्ट्रीय संकटाच्या वेळीं माधवाचार्यांसारख्या राष्ट्राभिमानी पुरुषास स्वस्थ कसें बसवेल? ते तडक श्रृंगेरीहून निघाले आणि हरिहरदेवास साह्य करून त्यांनीं हिंदुधर्मपातशाहीची स्थापना करविली.

माधवाचार्य हे अनेगुंदीस आल्यावर, त्यांनीं आपली आराध्य-देवता भुवनेश्वरी हिला साष्टांग प्रणिपात केला आणि तिची षोडशोपचारें पूजा केली. माधवाचार्यांच्या भक्तीनें संतुष्ट झालेल्या भुवनेश्वरीनें त्यांस मूर्तिमंत दर्शन दिलें आणि वर माग म्हणून सांगितलें. माधवाचार्यांस या वेळीं राज्यस्थापना करण्याकरितां संपत्तीची अवश्यकता होती; आणि "आसमंतात् असलेल्या दहा मैल घेराच्या प्रदेशांत सुवर्णवृष्टि होऊं दे" असा त्यांनीं देवीपाशीं वर मागितला. देवीनेंहि आपल्या प्रतिज्ञेप्रमाणें तो वर पुरा केला. या सुवर्णवृष्टींत जीं नाणीं खासगी आवारांत पडलीं, तीं त्याच्या मालकांस देण्यांत आलीं आणि

सरकारी जमिनीवर पडलेलीं नाणीं सरकारी खजिन्यांत पोंचविण्यांत आलीं. याच संपत्तीमुळें विजयनगरचे राजे अतोनात श्रीमंत झाले असें सांगतात. ही गोष्ट खरी असो अथवा नसो, श्रीविद्यारण्य-स्वामींच्या निवासामुळें विजयनगरास श्री आणि सरस्वती या दोहींची जोड लाभली एवढें मात्र खरें. विद्यारण्यस्वामी हे हरिहर आणि बुक्क या दोघां राजांस आपल्या अनुभवाचा कित्येक वर्षें फायदा देऊन आणि आपण लावलेला साम्राज्यवृक्ष फोंफावलेला पाहण्याचें सुख अनुभवून समाधिस्थ झाले!

प्रकरण तिसरें.

राजधानी व उत्सव.

---:०:---

राजधानी.

राष्ट्राच्या संस्कृतीची कल्पना त्याच्या राजधानीवरून बरीचशी करितां येण्यासारखी असते. राजधानी म्हणजे राष्ट्राचें केंद्रस्थानच होय. रोम, कार्थेज आणि बाबिलोन या प्राचीन राष्ट्रांचीं नांवें त्यांच्या राजधान्यांनींच इतिहासांत अजरामर करून ठेविलीं आहेत. अर्वाचीन काळींहि लंडन, प्यारिस, वॉशिंगटन, टोकिओ आणि बर्लिन या राजधान्या आपल्या साम्राज्यांच्या वैभवाची पूर्ण साक्ष देत आहेत. सुदैवानें विजयनगरचींहि वर्णनें आज उपलब्ध असून, ज्यांनीं तें नगर प्रत्यक्ष पाहिलें, अशा लेखकांनीं तीं लिहून ठेविलीं आहेत.

विजयनगरचीं वर्णनें लिहून जवळजवळ पांच शतकें लोटलीं

असतांहि, तीं वाचणारांस या भौतिक सुधारणांच्या विसाव्या शककांतहि त्या नगराच्या ऐश्वर्यासंबंधीं आश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाहीं. अबदुल रझाक नांवाचा इराणच्या राज्याचा वकील दुसऱ्या देवरायाच्या कारकीर्दींत विजयनगर येथें इ. स. १४४३ त एप्रिल महिन्याच्या अखेरीपासून तहत डिसेंबरच्या पांच तारखेपावेतों होता. त्यानें लिहून ठेविलें आहे कीं, ' विजयनगर हें शहर अगदीं अद्वितीय आहे. तसलें दुसरें शहर मीं आजपर्यंत डोळ्यांनीं पाहिलेलें नाहीं, किंवा पृथ्वीच्या पाठीवर दुसरीकडे कोठें असल्याचें ऐकलेंहि नाहीं. शहराचा घेर साठ मैलांचा होता. एवढ्या घेराचें आज मितीसहि एक सुद्धां शहर नाहीं.

विजयनगर हें धारवाडच्या थेट पूर्वेस सुमारें ४५ कोसांवर तुंगभद्रा नदीच्या दक्षिण तीरावर वसलेलें होतें. तिकडे वर्षभर नदींत पाणी वाहत असून, आसपास बरेच कोसपावेतों नदीस उतार नव्हता; व पावसाळ्यांत तर तिचा प्रवाह साहजिकच भीषण आणि उद्दाम होत असल्यामुळें, उत्तरेकडून चाल करून येणाऱ्या परचक्राच्या मार्गांत तुंगभद्रा म्हणजे एक मोठें विघ्नच होतें. शिवाय, शहराभोंवतीं उंच उंच डोंगरांच्या रांगा दूरवर पसरलेल्या होत्या. याप्रमाणें नगराचें संरक्षण करण्यांत निसर्गानें कोणतीहि कमतरता केली नव्हती. तरी तेथील नृपतींनीं तेवढ्यावरच विसंबून न राहतां, राजधानी भोंवतीं उत्कृष्ट तटबंदीहि निर्माण केली होती. त्यांनीं एकीच्या आंत एक अशा सात भक्कम भिंती अथवा शहरकोट उभारून, शिवाय एकाच्या आंत एक असे सात किल्लेहि बांधले होते; मध्यें जेथें पहाड आले होते तेथें पहाडांवरूनहि कोटाच्या भिंती नेल्या होत्या. उंच माऱ्यांच्या ठिकाणीं जागोजागीं बुरूज बांधले होते; कोटांभोंवतीं सपाट भागीं पाण्याचे खंदक केले होते आणि प्रत्येक शहरकोटांत एक मजबूत दरवाजा करून या सर्व दरवाज्यांवर

बुरूज बांधले होते. अगदीं बाहेरील कोटाच्या दरवाज्याजवळ प्रत्येक बाजूस एक, असे दोन्ही बाजूंस मिळून दोन भव्य व सुंदर बुरूज बांधून, त्यांसही खूप मजबूत केलें होतें. व थोडक्याशा लोकांनिशीं शत्रूपासून त्यांचें रक्षण करितां यावें, अशी त्या बुरुजांची रचना केली होती. नगरांत प्रवेश करण्यास या दरवाज्याखेरीज दुसरा मार्ग नव्हता. अगदीं बाहेरील आणि त्या लगतच्या शहरकोटांच्या दरम्यान पुष्कळ जागा होती. तेथें शेतें आणि बागबगीचे असत. राजवाड्याभोंवतालच्याच कोटाचा एवढा घेर होता कीं, सबंध लिस्बन शहरचा किल्ला त्यांत मावून गेला असता. कोटाचा दरवाजा भक्कम असून, तेथें नेहमीं पाहरेकऱ्यांचा पाहरा असे. ते पूर्ण तपासणी केल्याखेरीज एका वस्तूचाही आंत शिरकाव होऊं देत नसत. अगदीं आंतील दुर्गाचा आकार वाटोळा असून त्याच्या समोरासमोरच्या दरवाज्यांमध्यें सात आठ मैलांचें अंतर होतें. खास राजवाडा हाही एक भला थोरला किल्लाच होता.

एखाद्या उंच टेंकडीवर जाऊन उभें राहिलें असतां, सर्व शहराचा फार मनोरम देखावा दृष्टीस पडे. नागरिकांच्या घरांसमोर सुंदर बगीचे फुललेले आहेत; नगरांतून इतस्ततः अनेक वृक्षांचीं उपवनें पसरलेलीं आहेत; कोठें कोठें विस्तीर्ण व रमणीय तलाव आहेत; राजवाड्यांतून आणि नगराच्या मधोमध स्फटिकाप्रमाणें चकचकीत दिसणारे पाण्याचे पाट वाहत आहेत; राजवाड्याजवळ ताल वृक्षांचीं बनेंचीं वनें लागलेलीं आहेत; आणि उत्तरेकडे तुंगभद्रेचें रम्य पात्र हा जणुं काय या नगरश्रीनें आपल्या मुखासमोर आरसाच धरिला आहे, असें एकंदर दृश्य पाहून प्रेक्षकाचें मन तल्लीन होऊन जाई.

विजयनगरजवळच कृष्णदेवानें नागलापूर म्हणून नवीन शहर वसविलें होतें. खास शहरांतून नागलापुराकडे जाणारा रस्ता इतका भव्य होता कीं, त्याची नुसती रुंदीच एखाद्या विस्तृत मैदानाएवढी

होती. त्याच्या दोन्ही बाजूंस घरांच्या आणि दुकानांच्या रांगा लागलेल्या असून शिवाय अनेक देवालयें होतीं. रस्त्यानें येणाराजाणारास छाया मिळावी, म्हणून वृक्ष लाविलेले होते. बाहेरच्या दोन शहरकोटांच्या दरम्यान बगीच्यांतून आंबा, सुपारी, फणस, लिंबू, नारिंग इत्यादि नाना प्रकारचीं झाडें असत. दुसऱ्या कोटाच्या दरवाज्यापासून राजवाड्या-कडे जाणाऱ्या सडकांच्या दुतर्फा भव्य भव्य इमारती व मोठमोठ्या अमीरउमरावांचें आणि इतर धनाढ्य आणि बड्या लोकांचे वाडे होते. घरांच्या दर्शनी भागांवर कैक प्रकारच्या चित्रकलेचीं आणि नक्षीचीं कामें असल्यानें, रस्ते फारच सुशोभित दिसत होते. तिसऱ्या कोटाच्या लगत जेथें हे रस्ते संपत होते, तेथें एक मोठें पटांगण होतें. हें शहराच्या मध्यभागीं असल्यानें, सर्व प्रकारच्या गाड्या व इतर वाहनें जाण्यायेण्यास त्याचा फार उपयोग होत होता. हें पटांगण संप-तांच शहरकोटास लागून त्याच्या दरवाज्याच्या आंतील बाजूस आणखी एक तसेंच विस्तीर्ण पटांगण होतें. पुढें जो दुसरा मोठा आणि सुंदर मार्ग होता, त्याच्या भोंवतालच्या रस्त्यांवर पुष्कळ श्रीमान् व्यापारी राहत असून, त्यांच्या दुकानांतून सर्व प्रकारचीं रत्नें, हिरे, माणकें, पांच, लहानमोठीं मोत्यें आणि मौल्यवान् कपडे यांचा व्यापार चालत असे. पृथ्वीवरील कोणतीहि वस्तु कोणाला घ्यावयाची असली तर ती तेथें मिळत होती. तेथें दररोज संध्याकाळीं यात्रा भरत असे, तव्हां तेथें पुष्कळ घोडे आणि सर्व प्रकारची फळफळावळ विकाव-यास येई. याच्याहि आंतील शहरकोटाच्या आंत सर्व प्रकारच्या धंदेवाल्यांचीं दुकानें होतीं. तेथें दर शुक्रवारीं यात्रा भरावी. त्या यात्रेंत सर्व प्रकारचे जिन्नस, प्राणी आणि पक्षी विकावयास येत. शिवाय नगराच्या निरनिराळ्या भागांतून दररोज बाजार भरावे, ते निराळे. हे रस्ते संपल्यानंतर टोंकास मुसलमानांची वस्ती असून, तेथें असलेली त्यांची मशीद हिंदूंच्या परधर्मसहिष्णुतेची साक्ष देत होती.

राजवाड्याच्या कोटाच्या आणि त्याच्या आंतील कोटाच्या दरवाज्यांवर पुष्कळ द्वारपाळ हातांत चामड्याचे चाबूक घेऊन पाहरा करीत. अमीरउमराव आणि इतर बडे लोक यांखेरीज इतरांस ते आपल्या अधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय आंत जाऊं देत नसत. या दरवाज्याच्या आंत एक भव्य मैदान असून, त्याच्या उत्तरेस डाव्या बाजूस कृष्णदेवानें ओरिसाच्या युद्धानंतर त्यांतील विजयाचें स्मारक म्हणून बांधलेलें विजयमंदीर होतें. या इमारतीजवळ आणखीहि कांहीं भव्य इमारती असून, पलीकडे आंतील बाजूस राजा आणि राण्या यांची खास निवासस्थानें होतीं, व त्यांच्या तैनातींतील बाराहजार दासींची जागाहि आंतच होती. राजा अथवा राण्या रहात असतांना पुरुषांस तिकडे जाण्याची परवानगी नसे.

आंतील राजवाड्याचा थोडासा भाग पाहण्याची एकदां कांहीं पोर्तुगीजांस परवानगी मिळाली होती. त्या वेळीं त्यांना जें एक दालन पहावयास मिळालें, त्याचें तळ, छत व भिंती सर्व सोन्याच्या पत्र्यांनीं मढविलेल्या होत्या. समोरील चतुष्कोण सभामंडपांत पद्मराग, हिरे मोती आणि इतर सर्व प्रकारचीं रत्नें यांचें काम केलेलें असून, त्याच्या छताला दोन सोन्याचीं झुंबरें टांगलेलीं होतीं. रत्नांचें सर्व काम पिंपळपानाच्या आकृतीचें असून, पानांमधील जागेंत बारीक मोत्यांच्या लडी चक्राकार बसविलेल्या होत्या. वर घुमट असून त्यांतून रत्नामोत्यांचीं झुंबरें लटकत होतीं. तेथें एक पलंग होता. त्याच्या पायांवर रत्नामोत्यांचें काम असून, चौकट सोन्याच्या पत्र्यांनीं मढविलेली होती; व त्याला एक वीतभर रुंद कठडा होता, तो सर्व मोत्यांचा होता. दुसरी एक खोली निव्वळ हस्तिदंती होती. तिच्या भिंती, तळ व छत हीं सर्व हस्तिदंताचीं होतीं. खांबांवर गुलाबाचीं व कमळाचीं फुलें होतीं, तीं हि हस्तिदंताचींच होतीं. एका वाड्यांत राज्याच्या बाहेरून आलेल्या—यांत पोर्तुगी-

ज्यांचाहि समावेश होतो—सर्व लोकांच्या चालीरीतींचीं चित्रें काढिलीं होतीं. ते लोक आपल्या देशांत कसे राहतात, हें त्या चित्रांत इतक्या बारकाईनें दर्शविण्यांत आलें होतें कीं, त्यांच्यांतील आंधळे आणि भिकारी कसे असतात, याचींहि चित्रें सुटलेलीं नव्हतीं. बाहेरील जगाचें राण्यांना ज्ञान व्हावें, म्हणून त्यांच्यासाठीं हीं चित्रें मुद्दाम काढलेलीं होतीं. एका अंगणांत चांदीच्या साखळदंडानें सोन्याच्या गिलिटाच्या पत्र्यांनीं मढविलेल्या खांबांवरून राण्यांचा झोके घ्यावयाचा झोंपाळा टांगलेला होता.

उत्सव.

दरवर्षी महानवमीचा उत्सव संपल्यानंतर राजा स्वतः राजधानींत सर्व सैन्याची पाहणी करी. कृष्णदेवाच्या वेळीं अशा एका पाहणींत हजर असलेल्या एका पोर्तुगीजानें तिचें जें वर्णन लिहून ठेवलें आहे, त्याच्या आधारानें त्या पाहणीचें खालील वर्णन दिलें आहे. त्यावरून त्यावेळच्या सैन्याची संख्या, पोषाक, हत्यारें आणि शिस्त इत्यादींविषयीं कल्पना करण्यास उपयोग होईल.

पाहणीमैदान शहरवस्तीपासून दीड कोसावर होतें. त्यावर नेहमीच्या ठराविक जागीं कृष्णदेवाचा खासा मखमलीचा तंबू लावला असून, त्यांत देवीची मूर्ति ठेवली होती. पाहणीच्या दिवशीं सर्वांच्या पुढें पायदळ, त्याच्या मागें घोडेस्वार आणि सर्वांच्या मागें हत्ती, अशा क्रमानें राजवाड्यापासून या तंबूपावेतों सर्व सेनानायकांनीं आपआपल्या सेनेच्या रांगा लाविल्या. या फौजा सखल जमिनीप्रमाणें टेकड्यांवरहि उभ्या असल्यामुळें, राजधानीच्या परिवांत यत्किंचितहि टापू रिकामा राहिला नव्हता. जेथें पहावें तेथें फौजच फौज. असलें दृश्य जगांत इतर कोठेंहि पहावयास मिळणार नाहीं, असें सदर पोर्तुगीज प्रेक्षकानें लिहून ठेवलें आहे. सर्व फौजा आपआपल्या जागेवर उभ्या होत्या. कोणत्या सेनानायकाच्या फौजेनें कोणत्या जागीं

उभें रहावयाचें, हें त्या सेनानायकाच्या दरबारांतील दर्जावर ठरविलेलें होतें. सेनानायकांबरोबर या वेळीं त्यांचा सर्व लवाजमाहि होता.

हत्ती आणि घोडे बहुमोल साज आणि दागदागिने घालून शृंगारलेले होते. त्यांच्या अंगावर रंगारंगाच्या, भरजरी, मखमलींच्या, साटनीच्या, रेशमाच्या अथवा किनखापाच्या आणि झालरदार अशा झुली होत्या. घोड्यांचे लगाम रेशमी होते. त्यांच्या कपाळांवर रत्नजडित चांद लाविलेले होते. चांदाच्या वरच्या बाजूस नागाची फणा अथवा दुसऱ्याच एखाद्या प्राण्याचें तोंड बसविलेले असून तें इतकें हुबेहुब होतें कीं, प्रेक्षकाचें तिकडेच लक्ष वेधलें जात होतें. हत्तीच्या सोंडेवर राक्षसांची व वन्य पशूंचीं तोंडें काढलेलीं होतीं.

प्रत्येक हत्तीवर अंबारींत चार चार शिपाई बसलेले होते. त्यांच्या अंगांत रूदार डगले होते. कांहीं घोडेस्वारांनीं आणि पादचारी सैनिकांनींहि डगले घातले होते. हे डगले म्हणजे मजबूत कच्च्या चामड्याचे एकावर एक थर देऊन आणि त्यांना बाहेरून लोखंडाचे पत्रे जडवून आणि आंतून रू शिवून केलेलीं चिलखतेंच होतीं. यांपैकीं कांहीं चिलखतांचे पत्रे चांदीचेच होते; व जे चांदीचे नव्हते, त्यांस वरून मुलामा दिलेला होता. अंगांवरील डगले आणि डोक्यांवरील टोप एकाच पद्धतीचे होते. स्वारांच्या डोक्यांवरील जिरेटोपांची मगजी मानेवर आलेली असून, पुढेंहि लहानसा पत्रा बसविलेला असल्यामुळें, मान व तोंड या दोहोंचें रक्षण व्हावयाची व्यवस्था होती. शिवाय, गळ्यांच्या संरक्षणाकरितां गळपट्टे होते. ते कांहीं चकचकीत पोलादीचे, कांहीं मुलामा दिलेले व कांहीं चांदीसोन्याचे होते.

कांहीं स्वारांचे पोषाख फार उंची म्हणजे निरनिराळ्या प्रकारच्या रेशमी आणि भरजरी किनखापाचे आणि मखमलीचे केलेले होते. पायदळांतील कांहीं शिपायांच्या अंगांतील कपड्यांचे रंग इतके विविध होते कीं, त्यांची मोजदाद करणेंहि अशक्य होतें, व मौल्यवान् तर ते इतके होते

कीं, भूलोकावर ते तयार झाले असतील, असें पाहाणारांस वाटत नसे.

स्वारांच्या कंबरेस तलवारी आणि लहान कुऱ्हाडी व हातांत भाले होते. तलवारींच्या मुठीवर नक्षीचें सुबक काम असून कुऱ्हाडींचे व भाल्यांचे दांडे चांदीसोन्यानें मढविलेले होते. हत्तीवरील शिपायांच्या हातांत ढाली आणि बरच्या होत्या. ढालाइतांच्या ढाली चांदीसोन्याचीं फुलें बसविलेल्या, तर कांहीं व्याघ्रसिंहांचीं चित्रें काढिलेल्या होत्या. कांहीं ढालींवर चांदीच्या वेलबुट्टीचें काम होतें, तर कांहींवर रंगाच्या नक्षीचेंच काम होतें. कांहीं ढाली काळ्या असून, त्यांजवर अशी अप्रतिम जिल्हई चढविलेली होती कीं, पाहणारानें त्यांत आरशाप्रमाणें आपलें तोंड पाहून घ्यावें. तिरंदाजांच्या धनुष्यांवरहि चांदीसोन्याचे पत्रे चढविलेले असून, त्यांच्या कंबरेस चांदीसोन्याच्या दांड्याचे जंबिये आणि कुऱ्हाडी होत्या. बरकंदाजाजवळ बंदुकी, कडाबिनी आणि जाड डगले सर्व व्यवस्थित असून त्यांचा थाट फार प्रेक्षणीय होता. सैन्यांत कांहीं मुसमानहि होते. ढाली, बरच्या, तुर्की धनुष्यें, कुलपी गोळे, भाले आणि इतर दारूगोळ्याचीं शस्त्रास्त्रें त्यांजजवळ असून, त्यांचा उपयोग करण्यांत ते इतके तरबेज होते कीं, त्यांचें कौशल्य पाहून पोर्तुगीज प्रेक्षकांनींहि तोंडांत बोट घातलें.

सैन्याची पाहणी करण्याकरितां कृष्णदेवाची स्वारी मौल्यवान् वस्त्रें धारण करून घोड्यावर निघाली. बरोबर मिरवणुकीच्या वेळचीं रत्नजडित दोन छत्रें होतीं. तसलीं रत्नें वापरण्याचें ज्यांच्या भाग्यांत असेल, त्यांखेरीज इतरांना एवढ्या मोठ्या सम्राटाच्या आभूषणांत कोणत्या प्रकारचीं रत्नें असतील, याची कल्पनाहि करणें शक्य नाहीं.

अमीरउमरावांच्या थाटाचें वर्णन करितांना सदरहू पोर्तुगीज लेखक म्हणतो.—" अमीर उमराव यांच्या थाटाचें वर्णन करूं गेल्यास, एक तर त्याचें पुरें पुरें वर्णन करणेंच अशक्य; आणि

जर कांहीं वर्णन केलेंच, तर त्यावर कोणाचा विश्वास बसणेंहि अशक्य." " त्यांचे घोडे आणि त्यांचीं चिलखतें यांचे योग्य वर्णन करण्यास पोर्तुगीज भाषेंत शब्दच नाहींत." " त्यांचें सर्व घोडे तर दिसणें शक्य नव्हतेंच, परंतु जितके दिसले तितक्यांचेंहि वर्णन करण्याचा प्रयत्न करणें व्यर्थ होय; कारण जातां जातां मला माझें तोंड इतक्यांदा इकडून तिकडे व तिकडून इकडे वळवावें लागलें कीं, त्यामुळें मी आतां घेरी येऊन खालीं पडतों कीं काय, असें मला झालें होतें. बाकी त्या देशांत इतकी संपत्ति आहे, आणि तेथील अमीरउमराव इतके श्रीमंत आहेत कीं, या सर्व थाटाबद्दल आश्चर्य वाटण्याचें मुळींच कारण नाहीं."

स्वारींत सर्वांच्यापुढें नाना प्रकारच्या आभूषणांनीं शृंगारिलेले हत्ती होते. राजाच्या पुढें त्याच्या ऐश्वर्यानुरूप भरजरी आणि रत्नामोत्यांचे साज घातलेले वीस घोडे होते.

याप्रमाणें कृष्णदेवाची स्वारी आपल्या सैनिकांचें निरीक्षण करीत करीत चालली. त्या वेळीं सैनिकांनीं आपल्या सम्राटाच्या जयजयकाराच्या ज्या गर्जना केल्या, आणि ढाली वाजवून जो निनाद काढिला, व त्यामुळें घोड्यांचें खिंकाळणें आणि हत्तींचे चीत्कार जे सुरू झाले, ते सर्व ऐकणारांस 'हें सर्व नगर उलथून पडतें कीं काय!' असें वाटूं लागलें. बंदुकांच्या बारांनीं आणि इतर अस्त्रांच्या भडाक्यांनीं सर्व पृथ्वी आणि पर्वत कंपायमान झाले, आणि त्या मैदानावरील कुलपी गोळ्यांचें आणि इतर दारूकाम पाहून, पोर्तुगीज प्रेक्षकांसहि " फार आश्चर्य " वाटल्यावांचून राहिलें नाहीं. " जणूं काय सर्व विश्व येथेंच एकवटलें आहे" असें दिसत होतें.

अशा थाटांत कृष्णदेवाची स्वारी आपल्या मंडपापाशीं येऊन दाखल झाली. तो पूजन आटोपून शहरांत परत जाण्याकरितां परत त्यांच्याजवळ येईपावेतों सर्व सैनिक आपली जागा न सोडतां

तेथल्या तेथेंच अगदीं निश्चल उभे राहिले. राजा आल्यानंतर सैनिकांनीं पुन्हां पूर्ववत् त्याच्या जयजयकाराच्या गर्जना केल्या.

स्वारी पुढें गेल्यावर सैनिकहि जावयास निघाले. त्या वेळीं जयघोषाच्या गर्जना, ढालींचा निनाद आणि धनुष्यांच्या प्रत्यंचेचा टणत्कार करीत सैन्यांना टेंकडयांवरून खालीं उतरतांना पाहून सदर पोर्तुगीज प्रेक्षकाचें तर "देहभानच हरपलें" व "मी काय कोठें स्वर्गांत आहें, किंवा स्वप्न पाहून राहिलों आहें" असें त्यास वाटलें. नंतर फौजा आपआपल्या डेऱ्यांवर निघून गेल्या आणि सर्व सेनानायक स्वारीबरोबर राजवाड्यापर्यंत जाऊन नंतर आपल्या मुक्कामांवर गेले.

प्रकरण चवथें

उत्कर्षाचा कळस

कृष्णदेव.



इ. स. १४९० मध्यें विजयनगर येथें एक मोठी राज्यक्रांति झाली, व हरिहरदेवानें स्थापलेलें घराणें पदभ्रष्ट होऊन, विजयनगरचें सिंहासन राज्यांतील दुसऱ्या एका घराण्याच्या ताब्यांत गेलें. या घराण्यांतील तिसरा राजपुरुष कृष्णदेव हा इ. स. १५०९ त सिंहासनारूढ झाला. विजयनगरच्या सुमारें अडीचशें वर्षांच्या इतिहासांत तेथील सिंहासनावर त्याच्याइतका प्रतापशाली आणि ऐश्वर्यवान् असा दुसरा कोणताहि राजा झाला नाहीं. राज्याच्या उत्कर्षाच्या कामास आपणा स्वतःस सर्वस्वीं वाहून घेऊन, ज्या विभूतींनीं जगाच्या इतिहासांत आपलें नांव

अजरामर करून ठेविलें आहे, त्यांतहि त्यास उच्च स्थान मिळालें पाहिजे. त्या वेळीं विजयनगरच्या वैभवाचा अगदीं कळस झाला. त्याच्या सैन्याला जेथें जेथें शत्रूशीं दोन हात करण्याचे प्रसंग आले तेथें तेथें त्यास विजयश्री प्राप्त झाली, त्याच्या नांवाचा जिकडे तिकडे पराकाष्ठेचा वचक बसला, आणि त्याच्या कारकीर्दींत राज्याच्या विस्ताराचीहि परमावधि झाली.

सिंहासनारूढ होतांच कृष्णदेवानें विजयनगरला आसपासच्या सर्व राज्यांत आद्य स्थान प्राप्त करून देण्याचा निश्चय केला. राज्याचीं सूत्रें हातीं आल्यावर त्यानें मागील सर्व कागदपत्र चाळून पाहिले. त्यांत नरसिंह भूपतीचा त्याला एक लेख आढळला. त्यांत असें लिहून ठेविलें होतें कीं आम्हांला पुरेसा अवकाश न राहिल्यामुळें, उदयगिरि मुद्गल आणि रायचूर हे किल्ले आम्ही स्वतः घेऊं शकलों नाहीं. सबब या राज्याचे आमच्या पश्चात् जे कोणी मालक होतील त्यांनीं हे तीन किल्ले घ्यावे. हे किल्ले वस्तुतः विजयनगरचे असून त्यांपैकीं, उदयगिरि ओरिसाच्या आणि मुद्गल व रायचूर हे विजापूरच्या ताब्यांत गेले होते. उदयगिरि हा किल्ला राज्याच्या ईशान्य बाजूकडे असून तो हातांत न राहिल्यामुळें पूर्वेकडील मुलखाची सुरक्षितता कमी झाली होती. मुद्गल आणि रायचूर हे दोन किल्ले कृष्णा आणि तुंगभद्रा या दोन नद्यांमधील प्रदेशांत असून त्यांबद्दल हिंदू आणि मुसलमान यांच्यामध्यें जवळ जवळ दोन शतकें घनघोर रणकंदनें माजून राहिलीं होतीं. परंतु अखेरीस कृष्णदेव गादीवर बसण्याच्या सुमारें वीस वर्षांपूर्वी मुसलमान तो प्रदेश बळकावून बसले होते. तो परत घेण्याचे भगीरथ प्रयत्न न करितां स्वस्थ बसणें म्हणजे राज्याच्या जीवितावरच गदा ओढून घेण्यासारखें होतें. असें असतांहि आपल्या पूर्वींच्या राजांनीं तो सोडविण्याचे प्रयत्न केले नाहींत, याबद्दल कृष्णदेवास फार वाईट वाटलें, व त्यानें लागलींच अशी भीष्म–प्रतिज्ञा केली कीं

शत्रूंनीं हा जो प्रदेश गिळंकृत केला आहे, तो मी त्यांच्या घशांतून ओढून काढीन.

सुमारें दहा वर्षेंपावेतों रात्रंदिवस अव्याहत प्रयत्न करून अखेरीस कृष्णदेवानें ही प्रतिज्ञा शेवटास नेली. त्यास सर्वस्वीं त्याचेंच अलौकिक शौर्य, पराक्रम आणि दीर्घ परिश्रम कारणीभूत झाले. सैन्याचें आधिपत्य नेहमीं स्वतःकडे ठेवून त्यानें त्यास इतकें दुर्दम बनवून सोडिलें कीं, जिकडे जिकडे त्यानें आपल्या फौजेचा मोर्चा फिरविला तिकडे तिकडे त्याला सारखे विजयावर विजय मिळत गेले. कोणीहि शत्रु त्याचा सामना करण्यासाठीं समोर येण्यास धजेना; व सामान्यतः मुसलमानांच्या मनांत हिंदूंच्या सामर्थ्याविषयीं पराकाष्ठेचा दरारा उत्पन्न झाला. सैन्याची तयारी करण्याच्या बाबतींत कृष्णदेवाचें जर्मनीचा माजी बादशहा कैसर वुइल्यम याशीं साम्य दिसून येतें. कैसरनेंहि गादीवर आल्या दिवसापासून जर्मनीस जगांत पहिल्या प्रतीचा दर्जा मिळवून देण्याच्या भावनेनें प्रयत्न सुरू केले होते. एकसारखें चाळीस वर्षें झटून त्यानें सैन्याचा असा कडेकोट बंदोबस्त केला कीं, महायुद्धास आरंभ झाल्याबरोबर जर्मन सैन्यास विलक्षण यश आलें. परंतु कृष्णदेव आणि जर्मन बादशहा यांजमध्यें महत्त्वाचा फरक आहे. जर्मन सैन्याची प्रारंभीं जरी फत्ते झाली, तरी शेवटीं त्यास हार खावी लागली. उलट कृष्णदेव हा विजयश्रीच्या गळ्यांतील हार होऊन बसला होता.

कृष्णदेवांत शौर्य आणि पराक्रम या गुणांबरोबर दया आणि औदार्य या गुणांचाहि फारच क्वचित् दिसून येणारा मिलाफ झाला होता. रायचूरच्या भयंकर रणक्षेत्रांत पुढें लांडगेतोड करीत चाल करून येणारें विजयोन्मत्त हिंदु सैन्य, आणि मागें पाण्यानें भरलेली खोल नदी, अशा कचाटींत भांबावून गेलेल्या मुसलमान शत्रूंची हिंदूंनीं चालविलेली कत्तल पाहून कृष्णदेवाच्या हृदयास पाझर फुटला; व

त्या वेळीं त्याचे सरदार शत्रूचा पुरा नायनाट करण्याची परवानगी मागत असतांहि ती देण्याचें त्यानें निश्चयपूर्वक नाकारिलें. मागें एकदां फिरोज़शहा नांवाच्या बाहमनी सुलतानास विजयनगरच्या सैन्यावर विजय मिळाला असतां, त्यानें निर्दयपणें एक लक्षाहून अधिक निरपराध हिंदु प्रजेची कत्तल करून, पुन्हां मागाहून मोठी फुशारकी मारिली होती; हें लक्षांत घेतलें असतां कृष्णदेवानें या वेळीं दाखविलेलें आत्मसंयमन त्यास फार भूषणावह होतें यांत संशय नाहीं. लोकोत्तर पुरुषांचें चित्त वज्राहूनहि कठोर आणि कुसुमाहूनहि मृदु असतें, असें म्हणतात तें यथार्थ आहे.

पादाक्रांत केलेल्या शत्रूच्या मुलुखाचा करितां येईल तितका अपहार करण्याचा मोह किती अनिवार असतो हें आपणांस इतिहासांत वारंवार दिसून येतें. परंतु हतवीर्य झालेल्या शत्रूशीं कृष्णदेवाचें वर्तन फार उदारपणाचें होतें. ओरिसाच्या राजाशीं युद्ध झालें, त्यांत शत्रूचीं बरींच शहरें, किल्ले, आणि मोठा प्रांत कृष्णदेवाच्या हातीं लागला. तो सोडवून घेण्याचें शत्रूंत सामर्थ्य राहिलें नसतांहि कृष्णदेवानें त्यास तो सर्व मुलुख परत देऊन टाकिला. विजापूरच्या फौजेचा मोड केल्यानंतर विजापूरच्या मुलुखाच्या तृष्णेस त्यानें आपल्या मनास शिवूंहि दिलें नाहीं.

कृष्णदेव हा जसा युद्धकलेंत निपुण होता, तसाच राजकारणांतहि निष्णात होता. तो दुसरे नाचवतील त्याप्रमाणें नाचणारा नसून सर्व साम्राज्याचा कारभार स्वतःच्या अकलेच्या जोरावर आणि स्वतःच्या तंत्रानें चालवी. परंतु जरी तो दुसऱ्याच्या हातांतील कळसूत्री बाहुलें नव्हता, तरी नुसतें लहरीस येईल तसें चालणाराहि नव्हता. कोणतेंहि महत्त्वाचें कार्य करावयाचें असल्यास, तो आपले मंत्री, सुभेदार व इतर बडे अधिकारी यांस बोलावणें पाठवी व असल्या सल्ला मसलतीच्या प्रसंगीं उपयोगांत येत असलेल्या खास वाड्यांत

—यास त्या वेळचें मन्त्रगृह म्हणतां येईल—एकत्र होऊन ते सर्व आपआपलीं मतें राजास निवेदन करीत. याप्रमाणें सल्लामसलत झाल्यानंतर तो काय करावयाचें तें ठरवीत असे.

कृष्णदेवाच्या कारकीर्दींत वरचेवर युद्धें चाललीं असतांही सुंदर देवालयें बांधून त्यांना नेमणुका करून देणें, तलाव बांधून व त्यांतून पाट काढून शहरांस आणि शेतांस पाणी पुरविणें, शहरें वसविणें, सडका बनविणें, व्यापार वाढविणें, किल्ले बांधणें वगैरे लोककल्याणाचींहि अनेक कामें त्यानें केलीं. इतकीं सर्व कामें करून तेलगु आणि संस्कृत साहित्याच्या अभिवृद्धीकडेहि त्याचें लक्ष होतें. तो विद्वानांचा आश्रयदाता तर होताच पण स्वतःहि सरस्वतीचा उपासक होता. त्यानें रचिलेलें एक काव्य अद्यापि सुप्रसिद्ध आहे.

कृष्णदेवाचें खाजगी आचरणहि कित्ता घेण्यासारखें होतें. त्यानें नित्य प्रातःकाळीं लवकर उठून मुद्गलाचे सर्व हात करून आपले सर्व स्नायु मजबूत करावे, मग पट्ट्याचे हात करावे व त्यानंतर पहिलवानाशीं कुस्ती खेळावी व हें झाल्यानंतर दूर दूर पावेतों घोड्यावर खूप दौड करून यावें. याप्रमाणें सतत मेहनत करून त्यानें आपलें शरीर उत्कृष्ट कमावून ठेविलें. घोड्यावर बसण्यांतहि त्याचा हात धरणारा कोणी नव्हता. हा सर्व व्यायाम दिवस उगवण्याच्या पूर्वीं त्यानें आटोपावा. नंतर स्नान, संध्या, पूजन इत्यादि विधि होऊन त्यानें राज्याचें कामकाज पहावें, व तें समाप्त झाल्यावर अमीर उमराव वगैरे जे लोक हजर झाले असतील त्यांना बोलावून त्यांचे मुजरे घ्यावे.

कृष्णदेव गोरा व देखणा असून त्याची उंची मध्यम होती. त्याचें भव्य शरीर पाहूनच प्रत्येकाच्या मनांत पूज्यभाव उत्पन्न होत असे. तो स्वभावानेंहि फार चौकस असून शिवाय विनोदी आणि आनंदीहि असे. दूरदूरचे प्रवासी त्याची मुलाखत करण्यास येत त्या

सर्वांवर त्याची फार छाप पडे. त्याजवर त्याच्या प्रजेचें प्रेम असून तिच्या मनांत त्याजविषयीं पूर्ण आदरभाव वसत होता.

कृष्णदेवाचे हे सर्व गुण पाहतां त्याविषयीं पाएस या पोर्तुगीज लेखकानें "तो मोठा बहादर असून सर्व कामांत पूर्ण पारंगत होता" असें जें लिहून ठेविलें आहे तें अगदीं यथार्थ भासतें.

राज्याभिषेक झाल्यानंतर अगदीं प्रथमचींसुद्धां जीं कृत्यें कृष्णदेवाच्या हातून झालीं, त्यांजवरून त्याची दक्षता आणि दूरदर्शीपणा हे गुण दिसून येतात. त्यानें प्रथम आपल्या वैऱ्यांस राजधानीपासून दूर अंतरावरील मजबूत किल्ल्यांत पाठवून देऊन त्यांचा बंदोबस्त केला. नंतर दुसरीकडे कोठेंहि न जातां दीड वर्ष विजयनगर येथेंच राहून पूर्वींच्या राजांच्या वेळच्या सर्व कागदपत्रांची व तसेंच राज्याच्या सर्व कारभाराची माहिती मिळविली. याच वेळीं उदयगिरि, मुद्गल आणि रायचूर हे किल्ले शत्रूच्या तावडींतून सोडविण्याबद्दलचा नरसिंहराजाचा आदेशलेख त्याच्या पाहण्यांत आला, व त्यावरून ते किल्ले परत घेण्याचा त्यानें संकल्प केला वगैरे उल्लेख वर आलाच आहे.

हे जे किल्ले सोडवून घेण्यासाठीं कृष्णदेवानें कंबर बांधण्याचा निश्चय केला, त्यांचे विजयनगरच्या दृष्टीनें काय महत्त्व होतें हें पाहिलें पाहिजे. विजयनगर हें राजधानीचें शहर तुंगभद्रेच्या दक्षिणतीरीं असून तिच्या उत्तरेस कृष्णानदीपावेतों वस्तुतः विजयनगरचेंच राज्य होतें, व पलीकडे मुसलमानांची जगड्व्याळ सत्ता पसरलेली होती. या सत्तेस थोपवून धरण्यासाठीं कृष्णा आणि तुंगभद्रा यांमधील प्रदेशांत असलेले मुद्गल आणि रायचूर हे किल्ले फार उपयोगाचे होते. याच कारणामुळें हिंदु आणि मुसलमान यांमध्यें त्या किल्ल्यांबद्दल जवळ जवळ सतत दोनशें वर्षें मधून मधून युद्धें होत गेलीं. परंतु अखेरीस १४९० च्या सुमारास ते विजापूरच्या

ताब्यांत गेले व त्यामुळें दुष्मानांच्या दाढा थेट राजधानीच्या गळ्यापावेतों येऊन भिडल्यासारख्या झाल्या होत्या. यासाठीं हे किल्ले सोडवून घेणें अत्यंत आवश्यक झालें होतें. त्यांत पुन्हां ईशान्येकडे असलेला उदयगिरि किल्ला हातीं न राहिल्यानें विजयनगरच्या मार्गांत एक नवीन विघ्न उत्पन्न झालें होतें. हा किल्ला ओरिसाच्या राजाच्या ताब्यांत गेल्यामुळें तिकडील मुलूखचा मुलूख कमी होऊन शिवाय किल्ल्याच्या अभावीं तिकडील प्रान्तांत सुरक्षितता ठेवण्यासाठीं आपलें कांहीं सैन्य तिकडे ठेवावें लागे. यामुळें रायचूर आणि मुद्गल घेण्याकरितां त्यांना आपलें सर्व बळ एकवटणें अशक्य होऊन बसलें होतें. म्हणून मुद्गल आणि रायचूरपेक्षां उदयगिरि किल्ला हस्तगत करून घेण्याची कमी आवश्यकता नव्हती.

शत्रूपासून मुलूख सोडवावयाचा म्हणजे स्वतःजवळची फौज चांगली तयार असली पाहिजे. व फौज चांगली तयार ठेवावयाची म्हणजे तिच्या वेतनाचा, हत्यारांचा व इतर खर्च भागविण्यासाठीं खजिन्यांत पुरेसें द्रव्य असलें पाहिजे. द्रव्य आणि सैन्य या दोन्ही साधनांची जमवाजमव करण्याचा राज्यकारभाराच्या पद्धतीशीं निकट संबंध असल्यामुळें त्या वेळीं प्रचलित असलेली पद्धति काय होती हें पाहूं.

विजयनगरच्या साम्राज्याचे निरनिराळे सुभे असून प्रत्येक सुभ्यावर एक सुभेदार अथवा गव्हर्नर नेमिलेला होता. सुभ्याच्या उत्पन्नाच्या मानानें सुभेदारास प्रतिवर्षीं ठराविक वसूल राजधानींतील खजिन्यांत पाठवावा लागत असून ठराविक घोडेस्वार, पायदळ आणि हत्ती ठेवावे लागत. सुभेदारांच्या नेमणुकी करितांनाच या दोन कर्तव्यांत बिलकुल हयगय न होऊं देण्याविषयीं त्यांना निक्षून बजाविण्यांत येत असे. वंशपरंपरागत चालत आलेल्या जहागिरी पुढें चालू ठेविणें अथवा न ठेविणें हें देखील सर्वस्वीं राजाच्या इच्छेवर अवलंबून होतें. यामुळें आपलीं कर्तव्यें बजाविण्यांत अक्षम्य चूक झाल्यास

आपणांस तत्काळ काढून टाकण्यांत येईल अशी भीति सुभेदारांच्या मनांत सदैव वागत असलीच पाहिजे. याप्रमाणें कृष्णदेवास आपल्या सुभेदारांकडून ठराविक वसूल पाठविण्याचें आणि ठराविक सैन्य ठेवण्याचें अशीं दोन्हीं कर्तव्यें चोख रीतीनें बजावून घेण्याचा संपूर्ण अधिकार होता. परंतु कृष्णदेवानें या बाबतींत स्वतःचें वर्तनहि असें नमुनेदार ठेविलें कीं त्यामुळें सुभेदारांच्या मनांवर त्यांच्या या कर्तव्यांचें महत्त्व पूर्णपणें बिंबून तीं त्यांच्या हातून विनतक्रार होत राहिलीं.

लढाईच्या खर्चास पुरेल इतक्या द्रव्याची जमवाजमव करण्याकरितां या विसाव्या शतकांतहि नेहमींच्या वसुलाखेरीज किती तरी रक्कम कर्जाच्या आणि अन्य स्वरूपांत प्रजेजवळून गोळा करावी लागते. कृष्णदेवाच्या काळांतहि पैशाच्या पुरवठ्याची व्यवस्था करणें फार दुर्घट होतें, त्या वेळीं इंग्लंडांत आठवा हेन्री राज्य करीत होता. त्याच्या अडचणी पाहिल्या असतां वरील म्हणण्याची सत्यता ध्यानांत येईल. या हेन्रीस लढाया आणि स्वतःचा डामडौल यांखालीं आपलें उत्पन्न पुरें पडत नसे. त्यामुळें त्यानें मठ आणि देवालयें यांची देखील मालमत्ता जप्त केली. कृष्णदेवाच्या ऐश्वर्याचें आणि लढायांचें वर्णन वाचलें म्हणजे एवढा सर्व खर्च त्याच्या उत्पन्नांतून भागत असे हें प्रथमदर्शनीं कोडेंच वाटतें. परंतु तो आपल्या उत्पन्नांतून सर्व खर्चापुरतें द्रव्य वेगळें काढून घेऊन दरसाल दहा लक्ष सुवर्णमुद्रा खजिन्यांत टाकीत असे, हें ध्यानांत घेतलें म्हणजे या कोड्याचा सहज उलगडा होतो. या त्याच्या काटकसरीचा आणि पद्धतशीर आचरणाचा साहजिकच परिणाम असा झाला कीं, त्याच्या सुभेदारांनीं आपआपल्या जिम्म्याचा वसूल राजधानीकडे पाठविण्यांत कधींहि हयगय करूं नये. याप्रकारें राज्याच्या जीवनास व उत्कर्षास आवश्यक असलेल्या सैन्यास लागणाऱ्या द्रव्याची कृष्णदेवानें व्यवस्था लाविली.

द्रव्याची व्यवस्था जमल्यानंतर विनियोगाचा प्रश्न उभा राहतो. विजयनगरची सेना कृष्णदेवाच्या पूर्वींहि अजस्र असे. परंतु बरीचशी फौज सुभेदारांनाच ठेवावी लागत असल्यामुळें ती राज्यभर पसरलेली असे. यामुळें तिच्या देखरेखीचें काम अवघड झालें होतें. परंतु प्रयत्न करणारास कठीणहि सोपें होतें. सर्व सुभेदारांचीं सैन्यें दर वर्षीं दसऱ्याच्या उत्सवाच्या वेळीं राजधानींत येऊन राजानें त्यांची पाहणी करावी असा एक प्रघात पडला होता. कृष्णदेवानें त्याचा चांगला उपयोग करून घेतला. त्याच्या कारकीर्दींत ही पाहणी म्हणजे उत्सवांतील नुसता एक तमाशा नसून पुढील सुधारणा करण्याचें उत्कृष्ट साधन बनलें होतें. राजाहि आपल्या खाजगत खर्चांतून कांहीं फौज ठेवी. या खाजगत फौजेंत हत्ती, घोडे आणि पायदळ सेना हे सर्व प्रकार होते. दसऱ्याच्या पाहणींत या खाजगी सैन्याची आणि सुभायतींतून आलेल्या सैन्याची तुलना होणें अपरिहार्य होतें. म्हणून कृष्णदेवानें खाजगी सैन्यावर जिवापाड मेहनत घेऊन, तींत वरचेवर शक्य तितक्या सुधारणा करून, तिला लवकरच नमुनेदार बनविलें. मग कृष्णदेवासारख्या राजाच्या अमलांत एकंदर सर्व फौजेची सुधारणा होण्यास कितीसा उशीर लागणार? थोड्याच अवकाशांत हत्ती, घोडे, सर्व प्रकारचें पायदळ, त्यांचें सामान आणि त्यांचीं शस्त्रास्त्रें यांची कडेकोट तयारी झाली. आधींच अफाट सेना, त्यांत ती कृष्णदेवाच्या खास नजरेखालीं याप्रमाणें तयार झालेली. तींतील जवानमर्द वीर, खंदे घोडे, अभेद्य चिलखतें आणि लकलकणारीं शस्त्रास्त्रें हा सर्व थाट बारकाईनें पाहणारास स्पष्ट दिसूं लागलें कीं, असल्या सैन्याशीं सामना करण्याचें सामर्थ्य कोणत्याहि शत्रूंत नाहीं.

शत्रूस टक्कर द्यावयाची म्हणजे द्रव्य आणि सैन्य यांप्रमाणेंच किंबहुना अधिक राज्याच्या संतोषाची आवश्यकता असते. सुभेदा-

रांनीं आपआपलीं कर्तव्यें बिनचूक बजाविल्यास त्यांस त्यांच्या सुभ्यांत पूर्ण स्वातंत्र्य असे; म्हणजे त्यांच्या कामकाजाच्या क्षुल्लक बाबतींत कृष्णदेव विनाकारण ढवळाढवळ करीत नसे. त्यामुळें नियमांचें बंधन सोसूनहि अधिकारी खुष असत. प्रजेपैकीं यःकश्चित् माणसासहि खुद्द राजाकडे अन्यायाचें गाऱ्हाणें नेतां येत असे. कोणीं जर फिर्याद केली कीं, अमुक एका सुभायतींत माझा माल चोरीस गेला, तर तावडतोब राजा तेथच्या सुभेदारास बोलावून आणून फिर्यादीस माल परत देववी. याप्रमाणें न्यायाच्या कामांत अधिकाऱ्यांच्या इभ्रतीस फाजील महत्त्व दिलें जात नसल्यामुळें प्रजेवर सहसा जुलूम होत नसे व त्यामुळें प्रजाहि संतुष्ट असे. ताबेदार सुभेदारांना जर आपआपलीं कर्तव्यें बजाविल्यावर पूर्ण स्वातंत्र्य असे, तर श्रीरंगपट्टण बंकापुर, गिरसप्पा, कालिकत, भाटकल, बरकूर येथल्यासारखे जे राजे साम्राज्याचे मांडलिक होते, त्यांना किती तरी अधिक स्वतंत्रता असली पाहिजे. या मांडलिकांच्या दरबारीं पोर्तुगीजांचे वकील देखील असत. असल्या वागणुकीनें सर्व राज्यांत संतोष नांदत असावा हें साहजिकच आहे.

प्रकरण पांचवें.
उत्कर्षाचा कळस.

—:o:—

कृष्णदेवाचे दिग्विजय.



याप्रमाणें कृष्णदेव आपली शक्ति वाढविण्याकरितां अविश्रांत परिश्रम करीत असतांना म्हैसूरकडील उम्मतूरच्या गंगराजानें पुंडावा माजविण्यास आरंभ केला. त्या वेळीं कृष्णदेवानें शिवसमुद्र आणि श्रीरंगपट्टण हे दोन्ही मजबूत किल्ले घेऊन त्याला

तावडतोब वठणीवर आणिलें. यामुळें तिकडील सर्व प्रदेशांत त्याच्या सत्तेची पूर्ण छाप बसली.

इसवी सन १५१३ त कृष्णदेव उदयगिरि किल्ल्यावर चालून गेला. हा हल्लीं मद्रास इलाख्यांतील नेलोर जिल्ह्यांत असून त्या वेळीं ओरिसाच्या राज्यांत होता. तो वास्तविक विजयनगरचा असून तिकडील प्रदेशांत शांतता ठेवण्याकरितां तो परत घेणें आवश्यक होतें हें वर आलेंच आहे. हा डोंगरी किल्ला असून त्यावर चढून जाण्यास फक्त एकच पाऊलवाट होती, व तीहि इतकी अरुंद होती कीं, तिनें दोन माणसांस बरोबर जातां येत नसे. म्हणून आंत अन्नसामुग्रीचा तुटवडा पडल्याखेरीज हा किल्ला हातीं लागणें शक्य नव्हतें. याकरितां कृष्णदेवानें त्यासभोंवतीं वेढा देऊन मोठमोठ्या टेंकड्या जमीनदोस्त केल्या, व किल्ल्यावर चढून जाण्याकरितां बऱ्याच वाटा व एक मोठा प्रशस्त रस्ताहि केला. याला सुमारें दीड वर्ष लागलें. नंतर त्यानें लागलीच मोठ्या जोराचा हल्ला करून तो किल्ला सर केला. तेथें ओरिसाच्या राजाचा चुलता त्याच्या हातीं लागला, त्यास त्यानें फार सन्मानपूर्वक वागविलें. उदयगिरि किल्ला कृष्णदेवाच्या स्वाधीन झाला तरी उभयतां राजांमध्यें सलोखा न झाल्यामुळें, कृष्णदेव ओरिसांतील कोंडविड नांवाच्या दुसऱ्या शहरावर चढाई करून गेला. तिकडून ओरिसाचा राजाहि १३०० हत्ती, २०,००० घोडेस्वार आणि ५,००,००० पायदळ एवढी फौज घेऊन सामन्यासाठीं सिद्ध होऊन आला. कोंड-विडच्या आंतील सैन्यास निसटून पळून जातां येऊं नये याकरितां तेथें कांहीं सैन्य ठेवून बाकी सैन्यानिशीं ओरिसाच्या राजाशीं दोन हात करण्याकरितां कृष्णदेव सहा कोस पुढें सरसावून गेला. तेथें एक नदी लागली, तिच्या बाजूस ओरिसाकडील फौजेचा तळ पडला होता. कृष्णदेवानें ओरिसाच्या राजाकडे निरोप पाठविला कीं, आपली युद्ध करण्याची इच्छा असल्यास आपण नदी उतरून यावें, आप-

णांस जागा देण्यासाठीं आम्ही तीन कोस मागें हटतों; नदी उतरत असतांना आपणांस आम्ही मुळींच उपद्रव करणार नाहीं; आपण नदी उतरून आलांत कीं रणास आरंभ करूं. ओरिसाच्या राजानें याचें कांहीं एक उत्तर न देतां लढाईची तयारी केली. हें पाहून कृष्णदेवानें नदी उतरून जाण्याचा निश्चय केला. नदी उतरत असतांना त्याच्या सैन्याच्या प्रतिपक्षाशीं पुष्कळ झटापटी होऊन उभयपक्षांचे बरेच लोक पतन पावले. नंतर तुमुल रणसंग्राम होऊन ओरिसाचा राजा पराभव पावला व रणांगणांतून पळून गेला. या लढाईंत शत्रूचे पुष्कळ घोडे आणि हत्ती कृष्णदेवाच्या हातीं सांपडले. नंतर मागें वळून दोन महिन्यांनीं कोंडविडचा किल्लाहि त्यानें हस्तगत करून घेतला. त्यानंतर एकाएकीं नदी ओलांडून अत्यंत त्वरेनें मोठमोठाल्या मजला करीत करीत तो अचानक कोंडपल्ले या शहरासमोर येऊन उभा राहिला. ओरिसाच्या राज्यांतील हें मुख्य शहर असल्यामुळें येथें सरदार वगैरे पुष्कळ वडी मंडळी होती. या शहराला गराडा देऊन तीन महिने लोटले तरी तें त्याच्या हातीं आलें नाहीं. परंतु त्याची फौज फार मोठी असल्यानें तें शहरहि त्यानें काबिज केलें. तेव्हां ओरिसाची राणी व राजपुत्र आणि मोठ्या दर्जाचे लोक त्याच्या हातीं सांपडले, त्यांस बंदिवान करून त्यानें विजयनगर येथें पाठवून दिलें. नंतर सुमारें दीडशें कोस चाल करून तो राजमहेंद्री येथें गेला, परंतु त्याला अडविण्यास कोणी पुढें आला नाहीं. तेथूनहि त्यानें कित्येकदां ओरिसाच्या राजास युद्धार्थ आह्वान केलें, परंतु त्याला लढाई देण्याची ओरिसाच्या राजाची हिंमत झाली नाहीं. कृष्णदेवाचा राजमहेंद्रीस सहा महिने मुकाम झाला. त्या अवधींत त्यानें तेथें एक देवालय बांधून दानधर्म वगैरे पुष्कळ सत्कृत्यें केलीं, व नंतर तो विजयनगर येथें परत आला. पुढें ओरिसाच्या राजानें विनंति केली कीं, आमच्या राणीची मुक्तता होण्याच्या आपल्या ज्या शर्ती असतील

त्या कळवाऱ्या. कृष्णदेवानें उत्तर दिलें कीं, आपण आपल्या मुलीचें आम्हांशीं लग्न करून द्यावें, आपला घेतलेला सर्व मुलूख आम्ही आपणांस परत देऊं. याप्रममाणें उभयतांत सख्य झालें. रावबहादुर चिंतामण विनायक वैद्य यांच्या " मध्ययुगीन भारत " या पुस्तकांत त्यांनीं म्हटलें आहे कीं " पूर्वकाळीं एकमेकाशीं भांडणाऱ्या क्षत्रियकुलांत आपसांत एकी घडवून आणण्याची ही रीतच होती. " (पृष्ठें ६,७.) या वेळीं आपल्या हतवीर्य झालेल्या शत्रूस त्याचा सर्व प्रदेश परत देण्यांत कृष्णदेवानें जें औदार्य दाखविलें तें त्यास फार भूषणावह आहे. या उदार धोरणाचा हा सुपरिणाम झाला कीं, कृष्णदेवाचे मागाहून विजापूरशीं युद्ध झालें, त्यावेळीं ओरिसाकडून त्यास मुळींहि उपद्रव झाला नाहीं.

कृष्णदेवास ओरिसावरील मोहिमींत पूर्ण यश आलें, व उदयगिरि किल्ला हस्तगत करून घेतल्यानें त्यानें आपल्या प्रतिज्ञेचा एक अंशहि पुरा केला. परंतु गेलीं पन्नास वर्षें कारोमांडेल किनाऱ्यावर एका सरदारानें फार बंडाळी माजविली होती. त्याचें पारिपत्य करणें अद्याप बाकी होतें. उदयगिरि हातीं येतांच ही बंडाळी मोडण्यासाठीं मोठें सैन्य तयार करून कृष्णदेव चाल करून गेला. न्यूनिझ या पोर्तुगीज बखरकारानें या सरदाराच्या किल्याचें केतुर हें नांव दिलें आहे. हा किल्ला कोठें असेल, हें निश्चयात्मक सांगणें आज कठिण झालें आहे. तथापि सदरील बखरकारानें दिलेल्या माहितीवरून असें कळतें कीं, त्या किल्याजवळ एक नदी असून तिच्यांत पाणी फार असल्यामुळें त्याला त्यावर हल्ला चढवितां येईना. पाणी कमी व्हावयाची वाट पहावी, तर पुष्कळ दिवस फुकट जातील, असा विचार मनांत आणून, त्यानें आपल्या सैन्याकडून त्या नदीजवळ पन्नास लहान नद्या खोदवून तिचें पाणी या पन्नास प्रवाहांनीं काढून दिलें. त्यामुळें नदीच्या पाण्याची खोली तेव्हांच कमी पडली व कृष्णदेवानें लागलींच किल्ल्या-

वर हल्ला केला. किल्ल्याच्या संरक्षणार्थ एक लाख पायदळ व तीन हजार स्वार होते, असें वर सांगितलेल्या समकालीन बखरकारानें लिहून ठेविलें आहे. संरक्षक सैन्यानें लढण्याची शिकस्त केली. पण अखेरीस त्याचें कांहींएक न चालून थोडक्याच दिवसांत कृष्णदेवानें तो किल्ला सर केला. तेथें सोळा लक्ष सुवर्णमुद्रा, जडजवाहिर, व पुष्कळ हत्ती आणि घोडे त्याच्या हातीं लागले. तें त्यानें आपल्या सेनापतींमध्यें वांटून दिलें.

आतां प्रतिज्ञेप्रमाणें मुद्गल आणि रायचुर हे किल्ले सोडवून घेणें शिल्लक होतें. हे किल्ले विजापुरच्या ताब्यांत असून त्यांचें विजयनगरला अत्यंत महत्व होतें, हें वर आलेंच आहे. विजापुरचाच सुलतान विजयनगरच्या सर्व शत्रूंत अत्यंत बलिष्ठ होता. विजयनगरच्या खड्गांत जें पाणी होतें त्याचा या शत्रूसहि अनुभव होता. परंतु मुसलमानांशीं युद्ध करितांना विजयनगरला घोड्यांची मोठी अडचण पडे. विजापुरच्या फौजेंत इराणी व अरबी घोडे अधिक असत. त्यांची बरोबरी देशी तट्टें करूं शकेनात. इराणांतून आणि अरबस्थानांतून हिंदुस्थानांत घोडे आणण्याचा व्यापार पुष्कळसा मुसलमानांच्या हातीं होता. या मुसलमान व्यापाऱ्यांचा ओढा साहजिकच मुसलमानी राज्याकडे असे. ही विजयनगरच्या मार्गांत मोठी गैरसोय होती. परंतु तिजपुढें उपायहि नव्हता. पुढें पोर्तुगीज लोक व्यापाराच्या निमित्तानें इकडे १४९८ सालीं आले. कृष्णदेवाच्या वेळीं त्यांस कोणत्याही प्रकारचें राजकीय महत्व नव्हतें. तरी ते एकंदर व्यापारांत घोड्यांचाहि व्यापार करीत. सबब त्यांजकडून मुसलमानांस एकहि घोडा न मिळतां, त्यांनीं आणिलेले सर्व घोडे एकट्या आपणासच मिळावे, अशी कृष्णदेवानें खटपट चालविली. परंतु पोर्तुगीजांच्या लोभी स्वभावामुळें आणि दुटप्पी वर्तनामुळें ही खटपट फलद्रूप झाली नाहीं. तरी हिंमत खचूं न देतां, कृष्ण-

देवानें सतत सहा वर्षे परिश्रम करून, सैन्यास लागणाऱ्या सर्व घोड्यांची जमवाजमव केली.

आतां कृष्णदेवाचे वेळीं विजयनगर आणि विजापूर यांचे परस्पर संबंध कसे होते, इकडे वळूं. केवळ 'बळी तो कानपिळी' याच न्यायानें इ. स. १४९३ च्या सुमारास विजापुरकर हे विजयनगरच्या मालकीचा कृष्णा आणि तुंगभद्रा या नद्यांमधील मुलुख बळकावून बसले होते, व त्यामुळें विजयनगर या राजधानीच्याच सुरक्षिततेंत कमीपणा आला होता. एवढा मोठा अन्याय झाला असूनहि विजयनगरचे राय मूग गिळून स्वस्थ बसले होते. परंतु उंटाच्या पाठीवर शक्तीपलीकडे ओझें लादलें, तर शेवटीं त्याच्या पाठीचें तुकडे पडण्यास, एक नुसती गवताची काडीहि पुरेशीं होते. या म्हणींतल्यासारखी विजयनगरची स्थिति कृष्णदेवाच्या समयीं झालेली होती. तशांत राज्याचीं सूत्रें कृष्णदेवासारख्या शूर, अभिमानी व तेजस्वी अशा रायाच्या हातीं होतीं. यासाठीं विजयनगरचें मित्रत्व कायम राखण्याकरितां विजापूरकरांनीं या वेळीं अत्यंत खबरदारी घ्यावयास पाहिजे होती. परंतु विजापूरचें धोरण त्याच्या अगदीं उलट होतें. उभयतां राज्यांमध्यें असे करारमदार झाले होते कीं, दोहोंपैकीं कोणत्याहि राज्यांतील कर्जदार, जमीनदार, बंडखोर आणि इतर गुन्हेगार दुसऱ्या राज्यांत पळून गेल्यास, त्याबद्दल मागणी झाली असतां तावडतोब त्यास पहिल्या राज्याच्या स्वाधीन केलें पाहिजे. विजयनगरकडील कांहीं जमीनदार आणि कर्जदार विजापुरच्या राज्यांत पळून गेले. त्यांसंबंधीं तेथील मंत्रिसभेंत प्रश्न निघाला असतां मुख्य प्रधानाचें असें मत पडलें कीं, या लोकांबद्दल मागणी केल्यास विजापूरकर ती नाकारतील. यावरून विजापूरसंबंधीं विजयनगर येथें किती अविश्वास होता हें व्यक्त होतें.

या वेळीं कृष्णदेवानें चाळीस हजार सुवर्ण मुद्रा देऊन एका

आपल्या विश्वासांतील मुसलमान व्यापाऱ्यास घोडे खरेदी करून आणण्यासाठीं गोव्यास पाठविलें. तो गोव्याहून तीन कोस अलीकडे पौंडा येथें येतांच, आदिलशहाचें पत्र मिळाल्यावरून पुढें गोव्यास न जातां आदिलशहाकडे पळून गेला. ही बातमी कृष्णदेवाकडे पोहोंचल्यावर त्यानें मनांत आणिलें कीं, आदिलशहा आपला मित्र असल्यामुळें त्यास पत्र लिहावें. म्हणून त्यानें त्यास अशा मजकुराचें पत्र पाठविलें कीं, आपणांमध्यें किती तरी वर्षांपासून मित्रता आहे. या मित्रतेचा कोणत्याहि कारणानें भंग होऊं शकत नाहीं. यासाठीं एका विश्वासघातकी माणसावरून आपण आपलें फार दिवसांचें सख्य मोडणार नाहीं, असा आम्हांस भरंवसा आहे. करितां आमची अशी विनंति आहे कीं, सदरहू व्यापाऱ्यास आपण आमचेकडे परत रवाना करावें. असें पत्र आल्यावर आदिलशहानें कृष्णदेवाची मागणी मंजूर करावयास पाहिजे होती. परंतु त्यानें त्याऐवजीं आपल्या काजींना आणि मंत्र्यांना बोलावून त्यांशीं खलबत करून असें ठरविलें कीं, सदरील व्यापाऱ्यास कृष्णदेवाकडे परत पाठवूं नये; व याप्रमाणें कृष्णदेवाच्या पत्राचा जबाब दिला. हा व्यापारी धर्मवेत्ता असून महंमदाच्या वंशांतला असल्यामुळें, त्यास विजयनगरच्या स्वाधीन न करण्याची काजी आणि मंत्री यांची सल्ला पडली होती. तो केवळ आपल्या कृपेची आकांक्षा धरून आला होता, असें सर्वांस भासविण्यासाठीं आदिलशहानें त्यास दाभोळ शहरहि दिलें. परंतु पुढें तो व्यापारी दाभोळहूनहि दुसरीकडे पळून गेला, व तो कोठें गेला याचा कोणास कांहींच पत्ता लागला नाहीं. कित्येकांचें असें म्हणणें आहे कीं त्याच्याजवळचें सर्व द्रव्य घेऊन आदिलशहानें त्याचा वध करविला.

विजापुराकडील नकाराचें उत्तर वाचून कृष्णदेवास मोठा क्रोध आला. उभयतां राज्यांमधील सख्याचा आदिलशहानें भंग केला हें

उघड झालें. कृष्णदेवानें लागलींच आपल्या मोठमोठ्या मंत्र्यांना बोलावून आणून त्यांना तें पत्र मोठ्यानें वाचवून दाखविलें. त्यावर मंत्रिसभेंत मोठा वादविवाद झाला. कांहींचें म्हणणें पडलें कीं, असल्या क्षुद्र कारणासाठीं युद्ध पुकारणें रास्त नाहीं. जग काय म्हणेल याचा विचार केला पाहिजे. मुसलमान म्हटला कीं तो अविश्वासनीयच. म्हणून या मुसलमानाच्या कृत्याबद्दल त्याजवर विश्वास ठेवणारांचाच दोष आहे. त्या मुसलमानास शासन करण्यासाठीं लढाई करावयाचीच, तर लढाईंत तो मुसलमान येणें कधींहि शक्य नाहीं. यास्तव विनाकारण बऱ्याच लोकांस यमसदनास पाठविण्याचा हेका धरणें नीतिसंमत म्हणतां येणार नाहीं. यावर दुसऱ्या पक्षाचें असें म्हणणें पडलें कीं, क्षुद्र कारणाकरितां मनुष्यसंहार करणारास जग हें निंद्य कोटींत ढकलील हें खरें. परंतु आमचा महत्वाचा प्रदेश गिळंकृत करून जवळजवळ राजधानीपावेतों विजापुरकरांनीं आपल्या दाढा रोंविल्या आहेत, याचाहि विचार झाला पाहिजे. आजवर आम्ही हा अन्याय सहन करून बसलों, म्हणूनच आमची आतां अशी दुर्दशा झाली आहे कीं, साधारण व्यवहारांतहि विजापुरकर आमचा असा उपमर्द करितात. असली पायमल्ली झाल्यावरहि आम्ही स्वस्थ राहिलों हें जर जगास माहीत झालें, तर त्यांत आमची केवढी अकीर्ति आहे! 'सम्भावितस्य चाकीर्तिर्मरणादतिरिच्यते.' मरण आलें तरी बेहत्तर, पण संभावित माणसानें अकीर्तीच्या मार्गाचा स्वीकार करितां कामा नये. शिवाय सहनशीलतेचीच नीति पसंत करावयाची, तर नुसत्या सुकीर्तीसच काय, पण अस्तित्वासही मुकावयास तयार असलें पाहिजे. आपला मुलुख शत्रूच्या दाढेंतून बाहेर काढण्यासाठीं आणि अपमानाचा सूड घेण्यासाठीं जो राजा युद्ध करितो, त्याला जग निंद्य कोटींत न ढकलितां नेहमीं त्याचे पोवाडेच गात राहतें.यासाठीं विजयनगरनें या वेळीं आपल्या पूर्वापार कीर्तीस शोभेल असाच निर्णय केला

पाहिजे. याप्रमाणें बरीच भवतिनभवति होऊन अखेरीस सजीव राष्ट्रांत नेभळटपणाच्या सल्लेची जी वाट लागावयाची तीच लागली, आणि आदिलशाहाशीं युद्ध करण्याचा निश्चय कायम झाला.

कृष्णदेवानें झालेली ही इत्थंभूत हकिकत शेजारच्या मुसलमान राजांस खलिते लिहून कळविली. त्या सर्वांकडून उत्तरें आलीं कीं आपण जें करीत आहांत तें योग्य आहे. आम्ही आपणांस होईल तितकी मदत देऊं. निजामशहाची बहीण आदिलशहास दिलेली असल्यामुळें, त्यास मात्र लोकापवादास्तव आदिलशहाच्या मदतीकरितां थोडीशी फौज पाठवावी लागली. फौजेची कमतरता होती म्हणून कृष्णदेवानें शेजारच्या राजांना हे खलिते पाठविलेच नव्हते. त्याचें धोरण केवळ इतकेंच होतें कीं, आपला पक्ष खरा आहे अशी इतरांची खातरी होऊन, त्यांस असत्पक्षास जाऊन मिळण्यांत संकोच वाटावा. दक्षिणेंतील पांचहि मुसलमान राजांत विजापुरचा आदिलशहा सर्वांत बलिष्ठ असल्यानें बाकीचे चौघेहि त्याचा मत्सर करीत होते. परभारें हिंदूंकडून त्याचीं हाडें नरम होण्याचा ठीक योग आला असें वाटून त्या चौघांना आनंद झाला.

कृष्णदेवानें विचार केला कीं आपली फौज तयारच आहे. यासाठीं युद्धास आरंभ करण्यांत आपण विलंब करणें ठीक नाहीं. जितका विलंब केला तितकाच शत्रूस तयार होण्यास अधिक अवसर मुद्दाम दिल्यासारखें होईल. म्हणून आपल्या सैन्यानिशीं शत्रूच्या प्रदेशावर चालून जाण्याचा त्यानें निश्चय केला. त्याच्या मंत्र्यांनीं त्यास सल्ला दिला कीं प्रथम रायचुरवर चढाई करून जावें. ती त्यास पटून तिकडेच प्रस्थान करण्याचें त्यानें ठरविलें.

कृष्णदेवाचे सैनिक—घोडेस्वार, हत्तीस्वार, व पायदळ म्हणजे ढालाईत, भालाईत, तिरंदाज, बरकंदाज, आणि तुर्क—आपआपलीं चिलखतें, शिरस्त्राणें, भाले, बर्च्या, तलवारी, जंबिये,

ढाली, बाण, कुलपी गोळे, बंदुकी अशा सर्व शस्त्रास्त्रांनीं सज्ज होऊन निघाले. सैनिकांप्रमाणेंच घोडे आणि हत्ती यांच्या झुली वगैरे सर्व सामान जय्यत तयार होतें. हत्ती म्हणजे पूर्वकालच्या हत्यारबंद मोटरी अथवा टयांक्सच होत. या हत्तींच्या सुळ्यांस तीक्ष्ण धारेच्या कटयारी बसविलेल्या असून, वरील हौद्यांत दोहों बाजूंस मिळून चार हत्यारबंद शिपाई असत. सुळ्यांच्या कटयारींनीं हत्ती माणसांस तेव्हांच चिरून टाकीत. यांखेरीज फौजेबरोबर तोफाहि पुष्कळ होत्या. कृष्णदेवानें सर्व सैन्याचें वार्षिक निरीक्षण करून तीनचार महिनेच काय ते लोटले असतील. या सैन्यानें कृष्णदेवाच्या नेतृत्वाखालीं आजपावेतों कित्येक शत्रूंस शरण यावयास लाविलें होतें; व आतां तर साम्राज्याचा महत्त्वाचा प्रदेश हरण केलेल्या शत्रूस शासन करण्याच्या मोहिमींत अंशभागी होण्याचा सुयोग आला होता. यामुळें अपूर्व आत्मप्रत्यय आणि उत्साह वाटून कृष्णदेवाच्या सैनिकांचे बाहु पराक्रम करण्यास स्फुरण पावूं लागले.

कूच करितांना वाटेंत फौजेस तकलीफ होऊं नये याचा योग्य बंदोबस्त करण्यांत आला. पुष्कळ व्यापाऱ्यांस शिधासामुग्रीचें सर्व सामान घेऊन अगाऊ पुढें रवाना केलें. प्रत्येक मुक्कामावर फौजेचा तळ पडतांच तिला जें लागेल तें सर्व सामान पुरविण्याची त्यांनीं व्यवस्था ठेविली. याखेरीज प्रत्येक सेनानायकाकडे निरनिराळे व्यापारी नेमून दिले, व फौजेस लागणारे सर्व जरूरी जिन्नस जवळ ठेवून त्यांनीं ते त्यांच्या सेनाविभागास बरोबर पुरवावे अशी तरतूद केली. बरोबर दहाबारा हजार भिस्ती घेतले, ते फौज कुच करीत असतांना पखालींत पाणी भरून राजाच्या पुढच्या बाजूस नेहमीं रस्त्यावर राहत, व ज्याच्याजवळ पाणी पुरविणारा नोकर नसेल त्याला पाणी देत. बरोबर धोबीहि अगणित होते, त्यामुळें स्वच्छतेसंबंधीहि तक्रार राहण्याचें कारण राहिलें नव्हतें. सर्व सैन्याच्या

पांचसहा कोस पुढें सुमारें पन्नास हजार शिपायांचें एक पथक ठेवून, त्याकडे पुढील प्रदेशांतील शत्रूच्या हालचाली वगैरेची टेहेळणी करून बातमी काढण्याचें काम सोंपविलें होतें. त्यास नेहमीं सर्व सैन्याच्या पांचसहा कोस अघाडीस राहावें लागे व दोन हजार हातांत धनुष्यबाण असलेले स्वार या पथकाच्या पिछाडीस राहत. राजाचा जेथें जेथें निद्रेसाठीं मुक्काम होई, तेथें तेथें त्याच्या डेऱ्याभोंवती प्रथम कुंपण घातलेलें तयार असावें, अशी सर्व मार्गभर व्यवस्था होती.

अशा सुव्यवस्थित रीतीनें कुचदरकुच करीत कृष्णदेवाचें लष्कर रायचुरहून दीड कोसांच्या अंतरावर मल्याबंद मुक्कामीं येऊन थडकलें. तेथें अन्य मार्गांनीं आणखीहि फौजा येऊन मिळाल्या. वाटेचा थकवा घालविण्यासाठीं त्यानें सर्वांस प्रथम विश्रांति दिली. नंतर वेढा देण्याचे सर्व बेत ठरवून किल्ल्याला गराडा देण्यास सुरवात केली. किल्याच्या खंदकाजवळ सर्व लष्कराचा तळ देण्यांत आला व तेथें ज्या त्या सेनानायकानें नेमून दिलेल्या जागीं आपआपलें लोक ठेविले.

रायचुरच्या उत्तरेस सुमारें पांच कोसांवर विजापुरची तेव्हांची वास्तविक सरहद्द कृष्णानदी असून, दक्षिणेस तुंगभद्रा जवळ जवळ तितक्याच अंतरावर आहे. या नद्यांमधील प्रदेशांत त्या काळीं बरेच लहान लहान नाले, विहिरी आणि कांहीं मोठमोठे तलाव असल्यामुळें पाण्याची विपुलता होती. आसमंतांतील प्रदेशांत मोठमोठ्या झाडांचा अभाव होता, पण दगडांचे गोटेचे गोटे चोहोंकडे पसरलेले होते. शहराभोंवतीं तीन मजबूत भिंती असून त्यांना आंतून मातीची भक्कम पुस्ती दिलेली होती, व सर्वांत उंच स्थानीं उत्तुंग आणि दुर्भेद्य दुर्ग बांधलेला होता. किल्याच्या आंत एक जिवंत पाण्याचा झरा असून त्याला वर्षभर पाणी राही. या झऱ्याखेरीज

तटबंदीच्या आंत बऱ्याच विहिरी आणि तलावहि होते. यामुळें शहरांत पाण्याचा तुटवडा पडण्याची मुळींच भीति नव्हती. आंत अन्नसामुग्रीहि पांच वर्षे पुरेल इतकी शिल्लक होती. शहराच्या रक्षणाकरितां आठ हजार शिबंदी, चारशें स्वार, वीस हत्ती, मोठमोठे दगड फेकण्याचीं तीस यंत्रें, दोनशें मोठ्या तोफा आणि शिवाय बऱ्याच लहान तोफा इतकी सिद्धता होती. किल्याचे बुरुज इतके जवळ जवळ होते कीं, एका बुरजावर बोललेलें शेजारच्या बुरजावर ऐकूं जाई. बुरजांच्या मधील जागेंत सभोंवार मोठ्या तोफा ठेविलेल्या होत्या. किल्यास वेढा जरी चोहों बाजूंनीं दिला होता, तरी उत्तरेकडे आणि दक्षिणेकडे सुळके गेल्यामुळें तिकडून किल्ला हातीं येणें अवघड होतें. यास्तव किल्ला सर करण्याचा नेटाचा प्रयत्न पूर्वेकडूनच होऊं शकत होता. म्हणून त्याच बाजूस कृष्णदेवानें आपल्या सैन्याचा तळ दिला होता.

स्वतः कृष्णदेवाची छावणी किल्ल्यापासून थोड्या अंतरावर असून तिच्याभोंवतीं कांटेरी कुंपण होतें. त्यास एक दरवाजा असून तेथें व सभोंवार बडे बडे सरदार पाहरा करीत होते. कुंपणाच्या आंत कृष्णदेवापाशीं खास तैनातींतील नोकरांबरोबर देवपूजेचा ब्राह्मणहि राहत असे. या छावणीपासून तों किल्यापावेतों सर्व सेनानायक आपआपल्या मुक्रर केलेल्या ठिकाणीं आपल्या लोकांसह तत्परतेनें हुकमाची अमलबजावणी करीत होते. या सर्व छावणीबाहेर निराळ्याच तळावर हेरांची छावणी होती. रात्रभर छावणींत फिरून शत्रुपक्षाचे कोणी गुप्त दूत आलेले आहेत कीं काय, इकडे लक्ष ठेवण्याचें काम त्यांचेकडे असे. धुण्याची जागा जवळ पाहून एका जागीं धोब्यांचाहि तळ पडला होता.

छावणींत शहरांतल्यासारखे रस्ते असून सर्व सेनानायकांच्या भागांत त्यांचे निरनिराळे बाजार लागलेले होते. तेथें मेंढ्या, बकरे,

डुक्कर, ससे, कोंबड्या, तीतर व इतर प्राण्यांचें मांस विजयनगरांतल्या-सारखें मुबलक मिळत असून, शिवाय दाळ, तांदूळ, मूग वगैरे सर्व जातींचीं धान्यें पाहिजे तितकीं मिळत होतीं. या बाजाराखेरीज आण-खीहि एक बाजार होता. त्यांत सर्व प्रकारचे जिन्नस म्हणजे लहान-मोठीं खेळणीं, सर्व प्रकारचे दागदागिने, हिरे, मोतीं, माणिक व इतर सर्व रत्नें विकावयास होतीं. कपडे सर्वांच्याच उपयोगांतले असल्यामुळें कापडविके तर तेथें असंख्यात होते. रायचुरच्या शेजारचा प्रांत नापीक, रेताड आणि उध्वस्त असतांहि चंदिचारा वगैरे तेथें विपुल मिळत असलेला पाहून सर्वांना फार विस्मय वाटे. एका पोर्तुगीज बखरकाराचे यासंबंधीं असे उद्गार आहेत कीं, आम्हीं या सर्वांचें वर्णन केलें, तरी आम्हांवर विश्वास कोण ठेवील? ५५१ हत्ती व ३२,४०० घोडे. यांखेरीज ओझीं लादावयाचीं गाढवें आणि तट्टें, आणि अन्नसामग्री व डेरेराहुट्या वाहणारे बैल, या सर्वांकरितां घांसदाणा किती लागत असेल, याची वाटेल त्यास कल्पना करितां येईल. या सर्वांची तेथें इतकी उत्तम व्यवस्था होती कीं, ही युद्धाची छावणी नसून फारा दिवसांचें वसलेलें सुसंपन्न शहरच आहे, असा पाहणारास भास होई. सैन्याबरोबर नगारे, तुताऱ्या वगैरे पुष्कळ वाद्यें असून, लढाई सुरू करितांना तीं वाजवीत, त्या वेळीं हा प्रळयकाळचाच घोष आहे कीं काय, असें वाटे. अशा वेळीं बिचाऱ्या पक्ष्यांची इतकी त्रेधा उडे कीं, वरून उडत येत येत ते कोलमडून खालीं पडत; व त्यांस पक-डण्याचा सैनिकांस एक खेळच होऊन बसला होता. " परंतु असे कितीहि वर्णन दिलें तरी तें कधींही संपावयाचें नाहीं, म्हणून तें तसेंच सोडून आपण लढाईकडे वळूं. "

वेढा सुरू होतांच आंतील शिबंदीनें वेढा घालणाऱ्या सैनिकांवर बाण, बंदुकी व तोफा यांचा मारा चालविला. त्यामुळें खंदकाजवळील शिपाई पटापट मरूं लागले. त्या समयीं फौजेची हिंमत खचूं नये,

म्हणून तीस उद्देशून कृष्णदेव म्हणालाः—“वीरहो, आपण कोणत्या उद्देशानें येथें आलों आहोंत, हें तुमच्या ध्यानांत आहेच. मनांतील निश्चय पूर्ण केल्याखेरीज माघार घेणें हें शूरांस शोभत नाहीं. शौर्य गाजविण्याचा असला प्रसंग भाग्यानें लाभत असतो. तो वाया दवडूं नका.” स्वतः कृष्णदेवाच्या तोंडच्या या प्रोत्साहनपर शब्दांनीं सैनिकांना नवीन स्फुरण चढून ते जिवाकडे न पाहतां निकारानें लढूं लागले. सेनानायकांनींहि आपआपल्या सैनिकांकरवीं पराक्रमाची शर्थ करविण्याची पराकाष्ठा केली. किल्ल्याच्या तटाच्या आणि बुरुजांच्या दगडावर इनामें लाविलीं. तटबंदी फोडतांना ज्यांचे प्राण जातील, त्यांना वाहून आणणारांसहि बक्षिसें देण्यांत येतील, असें जाहिर केलें. आधींच साम्राज्यावर झालेल्या जुलमाच्या प्रतीकारार्थ प्राण अर्पण करण्यास तयार होऊन आलेली सेना, व तिच्यापुढें कृष्णदेवानें असलें पारितोषकाचें आमिष ठेविलें. त्यामुळें सैनिकांच्या मर्दुमकीस जगूं काय ऊतच आला. त्यांनीं हां हां म्हणतां तटबंदींत पुष्कळ ठिकाणीं खिंडारें करून शहर उघडें पाडिलें. परंतु शहर विलक्षण मजबूत असून, त्याचें रक्षण करीत असलेले शिपाई फार शूर व कडवे असल्यामुळें, वेढा देणारांपैकीं बऱ्याच लोकांस आपल्या प्राणांची आहुति द्यावी लागली. परंतु त्यामुळें कृष्णदेवाच्या सैन्याचें धैर्य न खचतां, जसजसे अधिकाधिक दिवस जात चालले, तसतसें तें वृद्धिंगतच होऊं लागलें. याप्रमाणें युद्ध चालतां चालतां तीन महिने लोटल्यावर आदिलशहा किल्ल्याची सोडवणूक करण्याकरितां तेथें मोठ्या फौजेनिशीं स्वतः चाल करून आला.

आदिलशहा समीप येऊन ठेपला असून त्यानें कृष्णेच्या उत्तर बाजूस तळहि दिला, अशी खातरीलायक खबर येतांच कृष्णदेवानें शत्रूच्या सर्व हालचालींवर नजर ठेवून बातमी काढण्यासाठीं आपले हेर रवाना केले. आदिलशहास वाटलें कीं, आपण येऊन पोहोंच-

त्याची बातमी लागतांच कृष्णदेव आपणांवर चाल करून येईल. म्हणून त्यानें नदीच्या तीरीं एका मजबूत अशा ठिकाणीं जवळ एकच उतार पाहून आपल्या सैन्याचा तळ दिला. त्या स्थानाच्या मजबुतीवरून त्यानें ठरविलें कीं, कृष्णदेव नदी उतरून आपणांवर चाल करून येईल त्या वेळीं उताराचेंच आपण असें रक्षण करावें कीं, कृष्णा उतरण्यांतच कृष्णदेवाच्या फौजेचा फडशा उडाला पाहिजे. म्हणून तेथेंच राहण्याचा त्यानें निश्चय केला. परंतु बरेच दिवस गेले तरी कृष्णदेव कांहीं एक हालचाल करीत नाहीं, असें जेव्हां आदिलशहानें पाहिलें, तेव्हां आतां पुढें काय करावें हा प्रश्न त्याच्या समोर उभा राहिला. त्यावर त्यानें आपल्या सेनापतींची सल्ला घेतली. त्या वेळीं निरनिराळ्या सेनापतींनीं निरनिराळीं मतें प्रकट केलीं. पुष्कळांचें हें म्हणणें पडलें कीं, कृष्णदेव आपणांस तुच्छ समजतो, म्हणून तो आपणांवर चालून येत नाहीं. आपलें सामर्थ्य आपल्या लोकांच्या मनांवर बिंबविण्याचा त्याचा हेतु आहे. एवढ्याचसाठीं तो थांबून राहिला आहे. आपण नदी उतरून गेलों कीं, एकदम आपणांवर हल्ला करण्याचा त्याचा संकेत दिसतो. इतरांनीं हें मत दिलें कीं, असें कांहीं नाहीं; कृष्णदेव वास्तविक घाबरला आहे. मुसलमानांनीं मागील लढायांत हिंदूंवर जे पुष्कळ विजय मिळविले, त्यांचें त्याला स्मरण झाल्यामुळें त्याची गाळण उडाली आहे. या लोकांनीं अशी सल्ला दिली कीं, आपण नदी ओलांडून पुढें चाल करून गेलें पाहिजे. आदिलशहाच्या फौजेनें दौर्बल्य दाखविणें उचित नाहीं. येथल्या येथेंच जितके अधिक दिवस आपण पडून राहूं तितकें आपलेंच अधिक नुकसान आहे. शत्रूच्या इतकें सैन्य आपणांजवळ नसलें तरी पूर्वींच्या युद्धांत आपण जें शौर्य गाजविलें तेंच आजहि आपणांमध्यें आहे. सर्व पक्षांचें म्हणणें शांतपणें ऐकून घेतल्यावर आदिलशहाचा स्वतःचा हा अभिप्राय पडला कीं, आपणांजवळ

एकंदर फौज किती आहे, हें पाहून नंतर जें कांहीं ठरवावयाचें तें ठरविणें योग्य होईल. फौजेची मोजणी करितां भालाईत, ढालाईत, तिरंदाज, बरकंदाज वगैरे मिळून एकंदर एक लाख वीस हजार पायदळ, अठरा हजार स्वार आणि दीडशें हत्ती भरले. याखेरीज मजबूत तोफखाना होता तो निराळा. इतकी फौज विजयनगरच्या सैन्याचा खचित पराभव करील अशी आदिलशहास आशा वाटूं लागली. म्हणून लागलींच त्यानें सैन्यास नदी ओलांडून शत्रूवर हल्ला करण्यासाठीं तयार राहण्याचा हुकूम दिला. त्याचा असा विचार होता कीं, नदी उतरून एका बाजूस आपण आपला तळ द्यावा, आणि तेथून फौजेच्या तुकड्या पाठवून कृष्णदेवाच्या छावणीवर हल्ले चढवीत जावे. असले अडथळे करीत राहिल्यानें किल्ल्याचा बचाव करितां येऊन, शिवाय सर्व फौजेनिशीं शत्रूस लढाई देण्यांत पूर्ण पराभव होण्याचीही भीति राहणार नाहीं, असा त्याचा समज होता.

आदिलशहानें नदी उतरून कृष्णदेवाच्या छावणीपासून पांच कोसांच्या आंत आपल्या सैन्याचा तळ दिला, व कृष्णदेवास आपलें पाणी बंद करितां येऊं नये, म्हणून त्यानें नदीतीरास लागून असलेलीच जागा लष्कराच्या तळासाठीं पसंत केली. तळासभोंवतीं मोठमोठे खंदक खणून पुढच्या बाजूस त्यानें सर्व तोफखाना ठेविला, आणि शत्रु चालून आला असतां कोणीं काय करावयाचें याची सर्व व्यवस्था केली. आदिलशहाच्या प्रत्येक हालचालीची खबर कृष्णदेवाकडे दूतांचे द्वारा येतच होती. त्यानें नदी ओलांडली ही खबर आली, तसा कृष्णदेवानें आपल्या सैन्यांत हुकूम फिरविला कीं, सर्वांनीं शत्रूस टक्कर देण्यासाठीं तयार रहावें. शत्रूनें तळ देऊन छावणीची मजबुती केली, अशी बातमी येतांच सर्व सैन्यानिशीं त्यावर हल्ला करण्याचा कृष्णदेवानें निश्चय केला. त्यानें सर्व सैन्याच्या सात

तुकड्या केल्या. त्याच्या सेनापतींत लागलींच शत्रूचा समाचार घेण्यांत अग्रस्थान मिळविण्याविषयीं स्पर्धा सुरू झाली. सैन्याच्या अग्रभागीं राहण्याचा मान श्रीरंगपट्टणच्या राजास देण्यांत आला. नंतर सर्व सैन्यास आज्ञा झाली कीं, शनिवारीं सकाळीं लढाईस तोंड लागावयाचें, त्यासाठीं सर्वांनीं हत्यारबंद होऊन तयार रहावें. दोन्हीं सैन्यें एकमेकांच्या निकट असल्यानें त्यांनीं क्षणभरहि आपलीं हत्यारें बाजूस न ठेवितां सर्व रात्र जागून काढिली.

शनिवारीं प्रातःकाळ होण्यापूर्वींच कृष्णदेवाच्या छावणींत नगारे, तुताऱ्या आणि इतर वाद्यें वाजूं लागलीं. त्यावेळीं फौजेच्या गलबल्यानें आकाश आतां कोसळून खालीं पडतें कीं काय, असें वाटूं लागलें. त्यांत पुन्हां घोड्यांचें खिंकाळणें व हत्तींच्या गर्जना यांची भर पडली. या सर्वांचा जो प्रचंड घोष झाला, तो अगदीं न भूतो न भविष्यति असा होता. त्या वेळीं शत्रूच्या फौजेंतूनहि असाच आवाज येत होता. त्यामुळें कोणाचा शब्द कोणास ऐकूं येईना. इशाऱ्यांनींच सर्व काम चालूं लागलें. कृष्णदेवाच्या हल्ल्याची पुढची रांग बनतां बनतां एक प्रहर दिवस वर आला. त्यानें आपल्या अग्रभागाच्या दोन तुकड्यांस शत्रूवर जोराचा हल्ला करण्याचा हुकूम सोडला व त्यांनींहि तो हुकूम तंतोतंत अमलांत आणिला. त्यांचा हल्ला इतका निकराचा झाला कीं, त्यांपैकीं पुष्कळसे लोक शत्रूच्या खंदकांच्या तोंडावर जाऊन पोहोंचले. आदिलशहाची अशी अटकळ होती कीं कृष्णदेव हल्ल्यास सर्वची सर्व फौज एकदमच पाठवील. म्हणून हल्ला आला म्हणजे प्रथम आघाडीवरील पथकांचा समाचार घेऊन नंतर तोफखाना चालवून सर्व शत्रुदळाचा फडशा उडवावा, असा आदिलशहाचा इरादा होता; व त्याप्रमाणें त्यानें फौज लावून ठेवून तोफखानाहि तयार करून ठेविला होता. परंतु कृष्णदेवानें निराळ्याच तऱ्हेनें हल्ला

केला, असें जेव्हां आदिलशहानें पाहिलें, तेव्हां त्यानें प्रथमचा बेत बदलून सर्व तोफखान्यास एकदम तोफा डागण्यास हुकुम दिला.

आदिलशहाच्या तोफखान्याचा मारा भयंकर होऊं लागला. कृष्णदेवाचे लोक तर प्रथमपासूनच अगदीं कसून लढत होते. परंतु यामुळें तोफांच्या गोळ्यांनीं कृष्णदेवाकडील स्वार, शिबंदी आणि हत्ती पटापट मरूं लागून मनस्वी नुकसान होऊं लागलें, हल्ल्याचा जोर कमी पडला आणि हल्ला करणारी फौज माघार घेऊं लागली. ती समरभूमीवरून पाय काढीत आहे हें पाहतांच शत्रूनें लगट करून जोराचा हल्ला केला, व कृष्णदेवाचें अघाडीचें पथक जें पळत सुटलें होतें त्याचा पाठलाग करीत सुमारें पाऊण मैल पुढची जमीन गांठली. येऊं नये तो प्रसंग येऊन ठेपला हें कृष्णदेवाच्या चटकन् लक्षांत आलें. असल्या आणीबाणीच्या वेळींच क्षत्रियांची परीक्षा होत असते. कृष्णदेवानें त्या वेळीं यत्किंचित्‌हि न डगमगतां आपल्या सभोंवतालच्या सैन्यास उद्देशून पुढील प्रकारचे उद्गार काढिले:— हे जे लोक शत्रूस पाठ दाखवून भागुबाईप्रमाणें पळून येत आहेत त्यांना क्षत्रिय कोण म्हणेल ? मरण मनुष्यमात्राच्या मागें लागलेलें असतांहि समरांगणांतून पळ काढून हे आपल्या पूर्वापार पिढीजाद ब्रीदास बट्टा कां लावून घेत आहेत ? या सैन्यांतील सर्वच क्षत्रियांस स्वधर्माचें असेंच विस्मरण झालें असेल काय ? नंतर गंभीर स्वरानें तो पुढें म्हणाला, जगांतील महाबलाढ्य अशा राजराजेश्वराचा देखील मीं पराभव केला, अशी घमेंड मारण्याची आदिलशहास आज संधि आली आहे खरी. पण असल्या राजराजेश्वरास मीं समरांगणां-तून पळवून लाविलें अशी फुशारकी मारण्याची संधि मात्र त्यास कालत्रयींहि मिळावयाची नाहीं. आतां या मंगल प्रसंगीं मजबरोबर मरण्यास जे तयार असतील ते पुढें या. लागलीच सर्व सेनानायक त्याच्या सभोंवतीं गोळा झाले. नंतर कृष्णदेवानें आपल्या बोटांतील आंगठी

काढून एका हुजऱ्यास दिली आणि त्याला सांगितलें कीं, ही राण्यांना नेऊन दे, त्या रीतीप्रमाणें सती जातील. सर्व फौजेचा क्षात्रधर्मोचित गति प्राप्त करून घेण्याचा निश्चय झाला. कृष्णदेव अश्वारूढ होऊन मागें राखून ठेविलेल्या सैन्यासह शत्रूवर चाल करून गेला. शत्रूस पाठ दाखवून पळत सुटलेल्या आपल्या सैनिकांवर मुळींहि दया न करितां प्रथम त्यांचीं मस्तकें उडविण्याचा त्यानें बरोबरच्या पथकांस हुकूम सोडिला. लागलींच त्या पळपुट्यांच्या गर्दनींवर तत्पक्षीयांच्याच तलवारींचे खपाखप घाव पडून त्यांचे मुडद्यांवर मुडदे पडण्यास सुरवात झाली. त्यामुळें ते तावडतोब देहभानावर आले व एकदम उलटून पाठलाग करणाऱ्या शत्रूवर बेफाम तुटून पडले. मागाहून कृष्णदेवानें राखून ठेविलेल्या अफाट सैन्याचा प्रचंड लोंढा आला. त्याच्या अनिवार वेगापुढ एकहि मुसलमान टिकाव धरूं शकला नाहीं. पाठलाग करितांना त्या विजयमदानें मुसलमानांत आधींच अव्यवस्था झाली होती, व या अचानक, नव्या दमाच्या व निकराच्या हल्ल्यानें तर त्यांचा पूर्ण घोंटाळा उडून त्यांच्यांतले असंख्यात लोक मारले गेले व त्यांनीं आपली छावणी मुद्दाम मजबूत बनवून ठेविली असतांहि तिचें रक्षण करण्याचा नुसता प्रयत्नहि त्यांच्या हातून झाला नाहीं. भांबावून जाऊन बचावासाठीं ते नदींत उड्या घेऊं लागले व मागोमाग कृष्णदेवाच्या फौजेनें येऊन त्यांना यमसदनास पाठविण्याचा एकसारखा सपाटा चालविला. त्यामुळें आदिलशहाच्या छावणींत मोठाच हाहाकार उडाला.

नदींत पाणी फार असल्यानें शत्रूचे सैनिक घोड्यांस बिलगून कसेंबसें पैलतीर गांठतात तों त्यांजवर दुसरेंच संकट कोसळलें. घोड्यांना वर चढतां न आल्यामुळें ते उलटून मागें माणसांच्या अंगावर धडाधड पडूं लागले. कृष्णदेवाचें सैन्य कांठावर उभें राहून शत्रूकडील जो मनुष्य दिसेल त्यास मारीत होतेंच. घोडे आणि माणसें नदींत अटकून राहिलीं, त्यांजवर गजसैनिकांनीं हत्ती घातले. ते नदींतील माग-

सांस पकडून फाडूं लागले. मनुष्यसंहार मनस्वी होऊं लागला. इतक्यांत कृष्णदेव स्वतः नदीजवळ पोहोंचला. त्या वेळचा तो देखावा पाहून त्यास करुणा आली. त्यानें फौजेस एकदम परतण्याचा हुकूम दिला. तो म्हणाला, ज्यांचा बिचाऱ्यांचा स्वतःचा मुळींहि दोष नाहीं आणि ज्यांचा वध व्हावयास नको होता, असे कितीतरी लोक मारले गेले आहेत. तेव्हां आतां सर्वजण मागें फिरा. सेनानायकांनीं ताबडतोब हुकमाची अंमलबजावणी केली. नंतर कृष्णदेव आदिलशहाच्या छावणींत गेला. तेथें त्यानें शहाच्या तंबूंत थांबून विश्रांति घेण्याचा बेत केला. परंतु त्याचे सेनानायक अशी विश्रांति घेण्याबद्दल त्यास दोष देऊन शत्रूचा पाठलाग करून त्याचा पूर्ण नायनाट करण्याचा हुकूम सोडण्याविषयीं आग्रह करूं लागले. त्यांनाहि कृष्णदेवानें असेंच सांगितलें कीं, पुष्कळ निरपराध लोक प्राणास मुकले असून वास्तविक ज्या आदिलशहानें गुन्हा केला त्याचें नुकसान थोडेंथोडकें झालेलें नाहीं. शिवाय रायचुर मागें तसेंच सोडून देऊन आपण पुढें जाणें हेंहि मला पसंत नाहीं. म्हणून किल्ला सर करण्यासाठीं तुम्ही सर्व तयार व्हा. आतां नवीन युक्त्या योजून वेढ्याचें काम मोठ्या नेटानें चालविलें पाहिजे. आदिलशहासंबंधीं तपास करितां कृष्णदेवास आढळून आलें कीं, त्यानें युद्धांत मुळीं भागच घेतला नसून आपलें सैन्य जीव घेऊन पळूं लागतांच त्यानें हत्तीवर बसून आडमार्गानें पोबारा केला होता.

विजयनगरकरांनीं या लढाईंत शत्रूकडील पांच सेनापति कैद केले. शिवाय ४००० आरमझचे घोडे, शंभर हत्ती, चारशें जड तोफा, कित्येक लहान तोफा, तोफखान्याच्या नउशें गाड्या आणि पुष्कळ तंबूडेरे त्यांना मिळाले. ओझ्याचे घोडे, बैल व इतर जनावरें जीं सांपडलीं त्यांचा तर हिशेब करणेंच शक्य नव्हतें. शिवाय अगणित माणसें आणि पुष्कळ बायकाहि हातीं लागल्या. पण कृष्णदेवानें बायकांना सोडून देण्याचा हुकूम केला. नंतर सर्व मृतांचें अत्यंत सन्मानपूर्वक

यथाविधि दहन करण्यांत आलें व स्वपक्षाच्या मृतांबद्दल दानें देण्यांत आलीं. विजयनगरकडच्या एकंदर सुमारें सोळा हजार सैनिकांस वीरोचित गति प्राप्त झाली. हें सर्व कार्य समाप्त झाल्यावर कृष्णदेवानें पुन्हा रायचुराकडे वळून, पहिल्याप्रमाणें किल्ल्याजवळ तळ दिला.

पुढें वेढ्याचें काम सुरू झाल्यानंतर कांहीं दिवसांनीं रायचुरचा किल्लेदार कामास आला. त्यामुळें आंतील शिबंदीचा धीर खचला, आणि आदिलशहाच्या पराभवानंतर वीस दिवसांनीं शहरचे लोक पुढें शुभ्र निशाण धरून कृष्णदेवाच्या छावणीकडे दयेची भीक मागावयास आले. तेव्हां मी तुमच्या जीविताचें आणि मालमत्तेचें संरक्षण करीन, असें कृष्णदेवानें त्यांस आश्वासन दिलें, आणि एका सेनानायकास शहर कबज्यांत घेण्याचा हुकूम दिला. त्या दिवशीं कृष्णदेवाच्या फौजेनें मोठा उत्सव केला. दुसऱ्या दिवशीं कृष्णदेव आपले बडे बडे उमराव, सेनानायक आणि अंगसंरक्षक यांसमवेत शहराकडे निघाला व किल्ल्याजवळ आल्यावर तेथें भेटीसाठीं बोलावून ठेविलेल्या प्रतिष्ठित व संभावित गृहस्थांस त्यानें कळविलें कीं, तुमच्या मालमत्तेच्या सुरक्षिततेविषयीं तुह्मी बेफिकीर असां. ज्यांची येथें राहण्याची इच्छा असेल त्यांना पूर्वीप्रमाणेंच येथें राहतां येईल. इतरांना आपल्या सर्व मालासकट जाण्याची परवानगी आहे. या औदार्याबद्दल आपली कृतज्ञता दर्शविण्यासाठीं त्याच्यापुढें त्या नागरिकांनीं लोटांगणें घातलीं. इतक्यांत फौज शहर लुटून राहिली आहे, अशी खबर आली. कृष्णदेवानें लागलींच लूट थांबविण्याची व्यवस्था करून लुटलेला सर्व माल ज्याचा त्यास परत देवविला आणि ज्यांनीं ज्यांनीं चोऱ्या केल्याचें त्याच्या कानावर आलें, त्यांना त्यांना त्यानें कडक शिक्षा ठोठावल्या.

अल्प काळांतच आदिलशहाच्या पराभवाची बातमी हिंदुस्थानभर

फैलावली. शेजारच्या निजामशहा आणि कुतुबशहा वगैरे मुसलमान राजांस आदिलशहाच्या अपजयानें आनंद झाला, तरी त्यांना स्वतःबद्दल काळजी वाटूं लागली. रायचुरसारखें मजबूत शहर कृष्णदेवानें चुटकीसरसें सर केलें, याचें त्यांना आश्चर्य वाटलें. कृष्णदेवाच्या बळाची आणि त्याच्या सैन्याच्या पराक्रमाची त्यांना प्रथम कल्पना नव्हती. त्याचा जेथें तळ होता तेथें त्यांनीं आपले वकील खलिते घेऊन त्याजकडे पाठविले. खलित्यांत असें लिहिलें होतें कीं, आदिलशहाचें पारिपत्य झालें, तव्हां आपण आतां संतोष मानिला पाहिजे. आतां अधिक लढाई आपण करूं नये. आपण थोर आहांत, सबब आदिलशहाजवळून जें जें आपण घेतलें असेल तें तें त्यांस परत करावें. म्हणजे आम्ही नेहमीं आपलेच आहोंत. परंतु आपला मानस भिन्न असला, तर आपण हें समजून असावें कीं, आम्हांस आपणांविरुद्ध आदिलशहाचा पक्ष घेऊन त्याचें सर्व नुकसान आपणांकडून त्यास परत देववावें लागेल. त्या सर्वांना कृष्णदेवानें एकाच मजकुराचा जबाब लिहिला.—"आपलें पत्र पावलें. आपण आमच्याविषयीं प्रशंसापर जें कांहीं लिहिलें ती सर्व आपली कृपा होय. आदिलशहास शासन करून त्याजकडून जें कांहीं आम्हीं घेतलें, तें सर्व योग्यच झालें. तें परत देणें आम्हांस योग्य दिसत नाहीं, व तें परत देण्याची आमची इच्छाहि नाहीं. 'आपण आमचें न ऐकल्यास आम्ही सर्व आपणांवर उठून आदिलशहास मदत करूं' असें आपलें म्हणणें आहे. त्याचें एवढेंच उत्तर आहे कीं, आपणांस इकडे येण्याची तकलीफ करण्याची जरूर नाहीं, स्वतःच्या मुलखांतच आपण धीर धरून रहावें. आपली हिंमत असली तर आम्हीच तेथें आपणांकडे येतों." नंतर खलिते घेऊन आलेल्या वकिलांचा पुष्कळ देणग्या देऊन त्यानें चांगला सत्कार केला व वरील उत्तरासह त्यांना परत पाठविलें.

कृष्णदेवाच्या परवानगीचा फायदा घेऊन जे रायचुरहून गेले, त्यांपैकीं बऱ्याच लोकांजवळ वाटखर्चहि नव्हता. तरी त्या सर्वांच्या प्रवासाची कृष्णदेवानें पूर्ण बेगमी करून दिली. नंतर त्यानें कांहीं दिवस मुद्दाम तेथें थांबून, शहरच्या सर्व कारभाराची व्यवस्था केली, व तटबंदी जेथें जेथें पडली होती, तेथें तेथें तिची दुरुस्ती केली. हें सर्व झाल्यावर शहराच्या संरक्षणार्थ पुरेशी फौज ठेवून तो विजयनगरला परत गेला. त्या वेळीं एकंदर प्रजेकडून त्याचा जो सत्कार झाला आणि या विजयाप्रीत्यर्थ जे उत्सव झाले त्यांची वाचकांनींच कल्पना करावी. या उत्सवांत अर्थातच फौजेस मोठमोठ्या देणग्याहि मिळाल्या.

हे उत्सव संपल्यानंतर आदिलशहाचा एक वकील आला आहे, अशी कृष्णदेवास वर्दी मिळाली. त्यानें त्यास बरेच दिवस तिष्ठत ठेवून एके दिवशीं भेटीस यावयास सांगितलें. त्या भेटींत वकिलानें मोठ्या अदबीनें आपला निरोप कृष्णदेवासमोर निवेदन केला. तो म्हणाला, "हुजूर, माझ्या मालकांनीं मला आपणांकडे पाठविलें आहे. माझ्यामार्फत त्यांची आपणांस अशी विनंति आहे कीं, आपण कृपा करून न्याय करावा. त्यांच्या हुकुमाप्रमाणें मी निवेदन करितों कीं, ते आपणांस सर्व जगांत अत्यंत सच्चे, नीतिमान् व बलाढ्य नृपति मानतात. अशा नृपतीशीं जसा सलोखा असावयास पाहिजे, तसाच त्यांनीं त्यांचेकडून आपणांशीं ठेविला होता. परंतु आपण त्यांच्याशीं असलेली मित्रता आणि शांति विनाकारण मोडिली. एवढेंच नव्हें, तर इतक्या वर्षांपासून जो तह होता आणि जो सर्व राजांनीं इतक्या सचोटीनें पाळिला, तो आपण मोडला. आपण आपल्या राज्यांतून बाहेर येऊन त्यांच्याशीं युद्ध कां केलें हें त्यांस माहित नाहीं. आपण रायचुर शहरास वेढा देऊन सभोंवतालचा प्रदेश उध्वस्त केला असे त्यांस कळलें, त्यापूर्वीं त्यांच्या मनांत आपणां-

बद्दल संशयहि नव्हता. परंतु ही बातमी आल्यामुळें त्यांना शहराच्या रक्षणाकरितां चाल करून यावें लागलें. तेव्हां त्यांच्या दरबारच्या सर्व लोकांचे आपण प्राण घेतले आणि त्यांची छावणी लुटली. हें सर्व आपल्या डोळ्यासमोरच झालें. म्हणून त्यांची अशी विनंति आहे कीं आपण त्यांचें नुकसान भरून द्यावें. त्यांचा तोफखाना आणि तंबू, घोडे आणि हत्ती, आणि इतर जें जें सामान आपण घेतलें तें तें सर्व त्यांचेकडे परत करावें, आणि रायचुर शहरहि त्यांच्या हवालीं करावें. त्यांच्या विनंतीप्रमाणें त्यांच्या सर्व जिनसांसंबधीं त्यांचें आपण समाधान करून दिलें, तर ते नेहमीं आपले दोस्त राहतील. नाहींपेक्षां आपलें कृत्य आपणांस कितीहि पसंत असलें, तरी तें दुष्कृत्यच होय.'' याप्रमाणें बोलून तो स्तब्ध राहिला. रायानें फर्माविलें कीं तुम्ही आतां विश्रांति घ्या; उद्यां तुम्हांस जाण्याची रजा मिळेल. नंतर रायाकडून रीतीप्रमाणें त्यास रेशमी झगा वगैरे वस्त्रें देण्यांत आलीं.

दुसऱ्या दिवशीं कृष्णदेवानें वकिलास कळविलें कीं, आदिलशहाच्या मर्जीप्रमाणें सर्व कांहीं परत देण्यास आम्ही राजी आहोंत; मात्र त्यानें येथें आम्हांस शरण यावें. वकिलानें तो निरोप आदिलशहास कळविल्यावर आदिलशहानें सरहद्दीवर रायाच्या सेवेंत हजर होण्याचा आपला मानस प्रकट केला. कृष्णदेवानेंहि एवढा फेरफार मान्य करून आदिलशहास सरहद्दीवर बोलावण्याविषयीं त्याच्या वकिलास कळविलें. वकिलानें तें मंजूर करितांच कृष्णदेव सरहद्दीजवळील मुद्गल शहरीं गेला. तेथें आदिलशहा अगदीं जवळ आहे असें कृष्णदेवास भासविण्यांत आल्यामुळें कृष्णदेव आदिलशहाची भेट घेण्यास उत्सुक होऊन पुढें जावयास निघाला. परंतु आणखी असें करीत करीत तो थेट विजापुराला गेला तरी त्याच्या भेटीस येण्याची आदि-

शहाची हिंमत झाली नाहीं. या चाळवाचाळवीमुळें कृष्णदेवास क्रोध येऊन, त्यानें जुन्या बहामनी राजांच्या वंशांतील कैदेंत असलेल्या एका वारसास बंधमुक्त करून त्यास मसनदीवर बसविलें. कृष्णदेव विजापुरास राहिला, तोंवर या नवीन सुलतानाचा अधिकार चालला; पण पुढें त्यास तो कायम ठेवितां आला नाहीं.

नंतर कृष्णदेव विजयनगर येथें परत गेला. तेथें एका अंतःस्थ कारस्थानांत त्याच्या युवराजाचा खून झाला. ती संधि साधून आदिलशहा रायचुरावर चालून आला. हें ऐकतांच कृष्णदेव दुसऱ्या कोणासहि कळूं न देतां घोड्यावर खोगीर ठेवून एकटाच भरधांव रायचुरला गेला. कृष्णदेव स्वतः रायचुर येथें आला असें कळतांच, तो ससैन्य आहे किंवा एकटाच आहे यासंबंधीं क्षणभरहि तपास न करितां, आदिलशहा घाबरून जाऊन जीव घेऊन पळाला. यावरून आदिलशहाच्या मनांत कृष्णदेवाची किती दहशत बसली होती याची कल्पना होऊं शकते. आदिलशहाच्या या वर्तणुकीवरून कृष्णदेवानें विजापुरावर स्वारी करून शहास मांडलिक करण्याचा निश्चय केला आणि रायचुरच्या लढाईंत तोफखान्याचें महत्व त्यास कळून आल्यामुळें तोफा बनविण्याचा कारखाना काढण्याच्या उद्योगास तो लागला. परंतु हा उद्योग यत्किंचित्‌हि नांवारूपास येणें विजयनगरच्या दैवीं नव्हतें. कृष्णदेवास एकाएकीं दुर्धर आजार होऊन त्यांतच त्याचा अंत झाला.

प्रकरण सहावें.

वज्राघात, उर्फ तालिकोटचा संग्राम.

कृष्णदेवानंतर अच्युतराय नांवाचा राजा विजयनगरच्या सिंहासनावर आरूढ झाला. त्याच्या कारकिर्दीच्या सुरुवातीस आदिलशहानें आपला गमावलेला मुलुख परत मिळविण्यासाठीं रायचूरच्या अन्तर्वेदीवर स्वारी केली व त्यांत त्यांस यशहि आलें. यावरून पोर्च्युगीज बखरकारानें अच्युतराय हा फार खुळसट व नेभळट माणूस होता, अशा तऱ्हेचीं विधानें केलीं आहेत. पण हें मत कृष्णशास्त्री या मद्रासमधील शिलालेखांच्या एका सुप्रसिद्ध वाचकास मान्य नाहीं. ते म्हणतात कीं, अच्युतराय हा नामर्द किंवा भित्रा होता, असें मुळींच म्हणतां यावयाचें नाहीं. शिपाइगिरीच्या गुणांमध्यें तो तरबेज होता आणि मर्दुमकीच्या कामांत तो कृष्णदेवाच्या तोडीचा होता. इतकेंच नव्हें, तर आपल्या प्रजाजनामध्यें त्यानें कृष्णदेवाइतकीच लोकप्रियता संपादन केली होती. अच्युतराय व कृष्णदेव यांच्या कारकिर्दीतील भरभराटीविषयीं ज्या आख्यायिका आज द्रवीड देशांत प्रचलित आहेत, त्यांवरून याच अनुमानास पुष्टि मिळते. अच्युतरायाच्या कारकीर्दीच्या पहिल्याच वर्षांत त्यानें तुलुक्क आणि उडिया या दोन सैन्यांचा पराभव केल्याचें वर्णन सांपडतें, आणि त्याच्या पुढील कारकीर्दींत खोदविलेल्या लेखांत त्यानें मोठमोठे दिग्विजय करीत थेट सीलोन देशावर आपल्या विजयाचा झेंडा रोवल्याची हकीकत नमूद केली आहे. कृष्णस्वामी यांचें तर असें मत आहे कीं, वरील शिलालेखांत अच्युतरायाचीं

पोकळ स्तुतिस्तोत्रें गाइलेलीं नसून, विजापूर व वरंगूळ या दोन्ही राज्यांवर मिळविलेल्या खऱ्याखुऱ्या व वास्तविक विजयांचा त्यांत उल्लेख आहे. या राजाच्या अंगचें क्षात्रतेज त्याचे असंख्य मांडलिक त्यास आदरपूर्वक मानसन्मान देत, त्यावरून तर विशेष खुलून निघतें. ही एवढी अफाट सत्ता तो स्वतःच्याच तंत्रानें वापरीत असे. तो ब्राह्मणांस आणि देवालयांस मोठमोठे दानधर्म करी, त्यामुळें आपण कृष्णदेवाच्याच कारकीर्दींत आहोंत कीं काय, असें त्याच्य प्रजाजनांस वाटत असे. या राजाच्या अंमलाखालीं सुमारें दोनशे मांडलिक राजे होते; व त्या सर्वांचे मिळून सहा लाख सैनिक त्याच्या हुकमासरशी रणांगणावर जाण्यास नेहमीं सिद्ध असत.

अच्युतराय इ. स. १५४१ मध्यें मरण पावल्यानंतर सदाशिवराय विजयनगरच्या गादीवर आला.पण तो केवळ नामधारी राज्यकर्ता होता. त्या वेळीं राज्यांतील प्रमुख सत्ता रामराया नांवाच्या एका बलाढ्य कारभाऱ्याच्या हातांत होती. कृष्णदेवाचा सळ्व तिम्म नांवाचा एक सुप्रसिद्ध मंत्री होता. त्यानें बरींच वर्षें विजयनगरच्या दरबारांत मोठी सत्ता गाजविली होती. त्यामुळें त्याच्या घराण्याचा तेथें मोठा बडेजाव होता. रामराय हा याच सळ्व तिम्माचा मुलगा. तो स्वतः मोठा कर्तृत्वशाली असून, राजघराण्यांतील एका राजकन्येशीं त्याचें लग्न झालें होतें. यामुळें विजयनगरच्या दरबारांत त्याचें प्रस्थ अतोनात वाढलें; आणि राजा सदाशिव याचें राज्यकारभारांत लक्ष नसल्यामुळें रामरायानें राज्यांतील सर्व सत्ता आपणाकडेच ठेवली आणि मुसलमानी सैन्यांवर विजयनगरचा दरारा कायम राखिला. दुर्दैवानें रामरायाच्याच वेळीं विजयनगरच्या साम्राज्याचा डोलारा एकाएकी ढासळल्यामुळें त्याच्या कारकिर्दीवर अपयशाचा कलंक देखील बसला आहे.

रामरायानें विजयनगर येथें कित्येक वर्षेंपावेतों मुख्य सत्ता गाजविली, आणि तालिकोटच्या लढाईंत त्याचा मृत्यु झाल्याबरोबर विजयनगरच्या साम्राज्याचा नायनाट झाला. तथापि तो केवळ राजाचा प्रधान असून, त्या वेळचा नामधारी राज्यकर्ता सदाशिव याच्या नांवानें तो ही सर्व सत्ता वापरीत असे. त्यास तिरुमल्ल आणि वेंकटाद्रि असे दोन भाऊ होते. त्यांजकडे तो मुलुखगिरीचीं मोठमोठीं कामें सोपवीत असे. आदिलशहाच्या एका बंडखोर सरदाराकडून शहाचा अगदीं पराभव होऊन, तो टेकीस आला असतांना, त्यानें विजयनगरहून कुमक मागितली. तेव्हां रामरायानें आपला भाऊ वेंकटाद्रि याजबरोबर मोठें सैन्य देऊन त्यास बंडखोराचें पारिपत्य करण्यासाठीं पाठविलें. या बंडखोराचें नांव ऐनुल्मुल्क असें होतें. त्याजबरोबर वेंकटाद्रीच्या ज्या झटापटी झाल्या, त्यांपैकीं एकीविषयीं मुसलमानी इतिहासकारानें खालीलप्रमाणें हकीकत लिहून ठेविली आहे. त्यावरून वेंकटाद्रीची दक्षता व युद्धकौशल्य दिसून येतें.

"एकदां हिंदु व मुसलमान सैन्यांच्या छावण्या समोरासमोर पडल्या असतां एनुल्उल्मुल्क यानें हिंदु सैन्यावर अचानक छापा घालण्याचा विचार केला. पण वेंकटाद्रीस त्याची अगाऊच बातमी लागली होती. त्यानें आपल्या सैन्यास सावध राहण्याचा हुकूम सोडला. नंतर लाकडाच्या मोठमोठ्या मुळ्या मागवून आणि त्यांच्या एका टोंकास तेलांत बुडविलेलीं फडकीं बांधवून त्या त्यानें तयार ठेवल्या; व अमुक एक संकेत झाल्याबरोबर आपल्या सैनिकांस त्या पेटविण्याचा हुकूम केला. उद्देश हा कीं, रात्रीच्या वेळेस शत्रु चाल करून आला असतांना स्पष्ट दिसावा. रात्रीच्या वेळेस ऐनुल्मुल्क हा आपल्या पूर्वी ठरलेल्या बेतास अनुसरून सुमारें दोन हजार निवडक शिपाई घेऊन हिंदूंच्या छावणीवर चालून गेला व तेथें थेट पोहोंचेपावेतों त्यास कोणी हरकत घेतली नाहीं. पण तेथें पोहोंचतांक्षणीं कांहीं

भलताच प्रकार घडला. हिंदूंच्या सैन्यास इशारा होऊन सर्व बाजूंस मुळ्या पेटविण्यांत आल्या, आणि सैन्याचा मुख्य सेनापति वेंकटाद्रि हा मुद्दाम तयार करून ठेविलेल्या एका तुकडीसह शत्रूच्या फौजेवर तुटून पडला. हा अनपेक्षित प्रकार पाहून मुसलमानी सैन्याची अगदीं तारांबळ उडाली, व त्यांतील पांचशें लोक कामास आले. ऐनुल्मुल्कानें मोठ्या शिकस्तीनें कसाबसा आपला जीव बचावला. पण अंधारांत त्याचा रस्ता चुकल्यामुळें, तो मरण पावला अशी त्याच्या सैन्यांत खोटीच बातमी पसरली, व तें निरनिराळ्या दिशेस फांकून गेलें. ऐनुल्मुल्क हा दुसऱ्या दिवशीं पहाटेस आपल्या छावणीवर येऊन पहातो, तों त्यास तेथें एक चिटपांखरूंदेखील आढळलें नाहीं. त्यामुळें त्यासहि निरुपायास्तव पळ काढावा लागला. पळत पळत तो थेट निजामशहाच्या राज्यांत येऊन पोहोंचला. पण तेथें त्याचा वध करण्यांत आला."

रामरायाच्या वेळीं मुसलमानांचीं आपसांत एकसारखी युद्धें चाललीं असत, आणि या युद्धांत आपआपलें हित साधण्यासाठीं ते रामरायाची मदत घेत. अशा वेळेस रामरायाच्या सैन्यास विजयश्रीनें माळ घातली असतां त्यानें अनन्वित अत्याचार केले, आणि मुसलमानांस या कृत्यांची चीड येऊन त्यांची एकजूट झाली व तालिकोटचा घनघोर रणसंग्राम घडून आला, असें मुसलमानी इतिहासकारांनीं लिहून ठेविलें आहे. म्हणून ज्या दोन युद्धांत हे अत्याचार घडले असें म्हणतात, त्यांविषयीं थोडा उल्लेख केला पाहिजे. पैकीं पहिलें युद्ध इ. स. १५९९ त घडलें. या युद्धांत रामराया हा आदिलशहास त्याचा शत्रु निजामशहा याविरुद्ध मदत करण्यास गेला होता. संयुक्त सैन्यास विजय प्राप्त झाल्यानंतर "त्या दोहोंनीं निजामशहाचा मुलुख आपसांत वांटून घेतला, आणि तो इतका उध्वस्त केला कीं, तेथें पूर्वीं वस्ती होती किंवा नाहीं, असें करून सोडिलें....विजानगरचे

काफीर याच गोष्टीची वाट पहात होते व त्यांनीं क्रौर्याचें कोणतेंहि कृत्य करण्याचें बाकी ठेविलें नाहीं."

यानंतर विजापूर (आदिलशहा) व अहमदनगर (निजामशहा) या दोहोंचें सख्य झालें. पण विजयी सैन्य आपल्या मुलखास परत जात नाहीं तोंच निजामशहानें कुतुबशहाची मदत घेतली, व तो आदिलशहावर (विजापूर) पुन्हां चालून आला. आदिलशहानें आपला जुना मित्र रामराया याची पुन्हा मदत मागितली. या प्रसंगीं रामरायानें ५०००० स्वार आणि असंख्य पायदळ आपल्याबरोबर घेतलें होतें. उभयपक्षांची गांठ कल्याण येथें पडली, व तेथें कुतुबशहा (गोवळकोंड्याचा सुलतान) हा निजामशहाचा पक्ष सोडून आदिलशहास येऊन मिळाला. यामुळें निजामशहास अहमदनगरच्या किल्ल्यांत पळून जाणें भाग पडलें. या वेळेस तिघां राजांनीं सभोंवतालचा मुलुख उध्वस्त करण्यासाठीं तुकड्या पाठविल्या. पण मुसलमानी इतिहासकाराचा रोष हिंदुसैन्यावर विशेष आहे. तो म्हणतो; "विजयनगरच्या फौजेनें फार नासाडी केली; मोठमोठ्या इमारती जमीनदोस्त केल्या; आपलीं तट्टें आमच्या मशिदींत बांधलीं; आणि आमच्या पवित्र ठिकाणांत आपलीं धर्मकृत्यें केलीं;" मुसलमानांच्या मशिदींत हिंदूचीं धार्मिक कृत्यें होणें शक्य नसल्यामुळें ही हकिकत अविश्वसनीय दिसते, हें सांगावयास नकोच.

"या मोहिमेनंतर रामराया हा मुसलमानी सुलतानांस तुच्छ लेखूं लागला, व त्यांच्या वकिलांस तो योग्य रीतीनें मानसन्मान देईनासा झाला. मुसलमानी वकिलांस तो आपल्या समोर बोलावी, तेव्हां त्यांस तो बसूं देत नसे; आणि त्यांच्याशीं अगदीं नेमकेंच तेवढें बोलून त्यांची रवानगी करी. आपली स्वारी कोठें निघाली म्हणजे त्यांस तो बरोबर घेई, आणि त्यांस पायींच चालावयास लावी; व आपला हुकूम झाल्याशिवाय त्यांस घोड्यावर बसूं देत नसे. नंदि-

दुर्गाच्या मोहिमेहून परत आल्यावर त्याच्या सैन्यांतील अधिकारी मुसलमानांशीं उद्दामपणानें वागूं लागले, आणि त्यांच्याशीं अयोग्य भाषा वापरूं लागले. खुद्द रामरायानें कुतुबशहा आणि आदिलशहा यांच्या मुलखाकडे लोभी दृष्टि ठेवून, त्यांच्या सरहद्दीवर आपलें सैन्य रवाना केलें. यामुळें या दोन्ही शहांस आपले कांहीं प्रांत हिंदु राजास तोडून द्यावे लागले."

रामरायाचा जोर आणि त्याची महत्त्वाकांक्षा एकसारखी वाढत चालल्याचें पाहून आदिलशहास मोठी काळजी पडली, व कांहीं तरी उपाय शोधून काढण्यासाठीं त्यानें आपल्या मंत्र्यांची सभा बोलावली. तेथें मोठी भवति न भवति झाली. ते म्हणूं लागले, "रामाराजाजवळ सैन्य फार आहे. त्याच्याजवळ द्रव्य मुबलक सांचलें आहे. समुद्रकिनाऱ्यावर त्याचीं साठ सत्तर बंदरें आहेत. या सर्व बंदरांतून, त्याच्या अफाट राज्यांतील निरनिराळ्या प्रांतांतून आणि त्याच्या मांडलिक राजांकडून त्याचा वसूल येत असतो. एवढ्या बलाढ्य राजाची आपल्या एकट्याच्यानें बरोबरी कशी करवेल ? यासाठीं त्याचा पाडाव करण्याकरितां दक्षिणेंतील सर्व मुसलमानी राज्यांची जूट केली पाहिजे." हा सल्ला आदिलशहास मान्य झाल्यामुळें त्यानें तसें करण्याचें ठरविलें.

आदिलशहा व कुतुबशहा यांचें लवकरच सख्य झालें. पण निजामशहा हा या कटांत कसा येणार ? कारण त्याचें तर आदिलशहाशीं हाडवैर होतें. पण निजामशहास कटांत आणण्याची हमी कुतुबशहानें घेतली. त्यानें निजामशहाकडे एका चतुर वकिलाची रवानगी केली. या वकिलानें मोठें उद्दीपक भाषण करून शहाचें मन या कटास अनुकूल करून घेतलें. तो म्हणाला, " पूर्वी बहामनी सुलतानांच्या वेळेस मुसलमानांची सत्ता एका हातीं होती. तेव्हां

हिंदूंचें आणि मुसलमानांचें बळ समान होतें. अलीकडे आपणांत फाटाफूट झाल्यामुळें हिंदु शिरजोर झाला आहे, व वेळींच त्यास लगाम न घातला तर थोडक्याच काळांत तो आपणां सर्वांस भारी होईल." या भाषणाचा निजामशहावर अनुकूल परिणाम झाला, त्यानें आपलें आदिलशहाशीं असलेलें वैर विसरून जाण्याचें ठरविलें आणि त्या दोहोंमध्यें शरीरसंबंध करण्याचा घाट देखील जमून आला.

अशा रीतीनें मुसलमानांची एकजूट झाल्यानंतर युद्धासाठीं कुरापत उकरून काढण्याकरितां रामरायाच्या ताब्यांतील कांहीं मुलुख आदिलशहानें परत मागितला, व ही मागणी नाकारण्यांत आल्यामुळें हिंदु-मुसलमानांचें उघड उघड वैर आलें. अहमदनगर व गोवळकोंडा या सुलतानांचें सैन्य थोडक्याच वेळांत विजापूर शहराशेजारीं असलेल्या विस्तीर्ण मैदानांत येऊन ठेपलें. तेथें आदिलशहानें आपल्या पाहुण्यांचा मोठ्या गौरवानें सत्कार केला. नंतर मुसलमानांचें सैन्य कृष्णेच्या रोखानें चाल करूं लागलें. जातां जातां तें कृष्णेच्या उत्तरेस तालिकोट नांवाच्या एका गांवाशेजारीं येऊन पोंचलें. या गांवाच्या दक्षिणेस पंचवीस मैलांवर कृष्णेचा विस्तृत प्रवाह वाहत होता. मुसलमानी सैन्य कृष्णेच्या दक्षिणेस* जाण्यापूर्वीं विजयनगर येथील स्थिति कशी काय होती याचा विचार करूं.

या वेळीं विजयनगर येथील कारभार अगदीं शांततेच्या वेळेप्रमाणें चालला होता. लोकांचा आपल्या पुढाऱ्यांच्या कर्तृत्वावर पूर्ण विश्वास होता. आपल्या बलाढ्य राजधानीस मुसलमानांनीं कांहीं वेळां शह

*तालिकोटच्या नांवानें प्रसिद्ध असलेली लढाई कृष्णेच्या उत्तरेस असलेल्या तालिकोट गांवाशेजारी झाली नसून कृष्णेच्या दक्षिणेस कांहीं मैलांवर घडली.

बसविले, आणि प्रत्येक प्रसंगीं त्यांस हताश होऊन परत जावें लागलें, याची स्मृति त्यांच्या मनांत पूर्ण जागृत होती. त्यामुळें ते आप-आपल्या नेहमींच्या व्यवसायांत अगदीं गर्क होते. आपल्या-वर कांहीं संकट उपस्थित झालें आहे, याची शंका देखील त्यांच्या मनास शिवली नाहीं. पश्चिमेकडील बंदरांतून व्यापारी मालानें लदून आलेले गोणीचे बैल आपला माल निर्भयपणें विजयनगरच्या वखारींत टाकीत होते; विजयनगरचा नामधारी राज्यकर्ता सदाशिव याचा वेळ नेहमींप्रमाणें ऐषआरामांत जात होता; आणि विजय-नगर येथील सर्व खरीखुरी सत्ता वापरणारा विजयनगरचा ऐश्वर्य-शाली राजा राम यानें आपला ताठरपणा यत्किंचितहि न सोडतां शत्रूंच्या हालचालींविषयीं आपली बेपर्वाईची वर्तणूक तशीच चालू ठेवली होती. फिरिस्ता म्हणतो कीं, मुसलमानांच्या वकिलांशीं त्यानें अपमानास्पद भाषा वापरली आणि त्यांच्या शत्रुत्वास त्यानें कस्पटासमान लेखलें.

पण या बाह्यात्कारीं दिसणाऱ्या शांततेच्या स्थितींत रामरायानें युद्धा-चा बंदोबस्त करण्याचें कामीं हयगय केली, असें नाहीं. त्यानें आपला भाऊ तिरुमल्ल याजबरोबर २०००० घोडेस्वार, १००००० पायदळ व ५०० हत्ती देऊन त्याची युद्धक्षेत्राकडे रवानगी केली व त्यास कृष्णेचे सर्व उतार रोखण्यास सांगितलें. त्याच्या पाठोपाठ त्यानें आपला दुसरा भाऊ वेंकटाद्रि याजबरोबर आणखी एक मोठें सैन्य देऊन त्याची रवानगी केली; आणि नंतर विजयनगरची सर्व सेना एकत्रित करून रामराया स्वतः तिकडे जाण्यास निघाला. या वेळीं रामरायाच्या निशा-णाखालीं विजयनगरच्या प्रत्येक प्रांतांतील फौजा जमा झाल्या होत्या. सरहद्दीवरील प्रांतांतून आलेले कानडी आणि तेलगू लोक, पश्चिमेस आणि मध्यभागांत असलेले म्हैसूरी आणि मलबारी, आणि दक्षिणे-कडील अगदीं खालच्या टोंकाकडून आलेले तामिल, हे आप-

आपल्या प्रांतिक जाहागिरदारांच्या हुकमाखालीं लढण्यास सिद्ध झाले होते. या सैन्याची गणना निरनिराळ्या प्रकारें केली आहे. पण हें सैन्य अजस्र होतें, एवढें मात्र खास.

मुसलमानी सैन्यानें कृष्णापार होण्यास बरीच दिरंगाई केली असें दिसतें. किंवा हिंदु सेनापतींनीं आपल्या सैन्याच्या हालचाली जलदीनें करण्यांत अधिक तत्परता दाखविली असावी. तें कसेंहि असो; शत्रूची टेहळणी करण्याकरितां पाठविलेले मुसलमानांचे हेर लवकरच अशी बातमी घेऊन आले कीं, शत्रूनें उताराच्या सर्व जागांचा अगदीं कडेकोट बंदोबस्त केला आहे. म्हणून आपल्या सैन्यासमोर जो एक उतार होता, तेथेंच नदी उतरून जाण्याचें मुसलमानांनीं ठरविलें. पण तेथें तर हिंदूंचा बंदोबस्त विशेष होता. नदीच्या दक्षिण किनाऱ्यावर त्यांनीं तटबंदी केली होती व तेथें कांहीं तात्पुरते मातीचे ढिगारे रचले होते; आणि शत्रु उतार व्हावयास लागला कीं, त्याजवर मारा करण्याकरितां त्यांनीं कित्येक तोफा रोखून ठेविल्या होत्या. अशा पेचांत मुसलमानी राजे सांपडले असतां त्यांनीं हिंदु सैन्यास हुलकावण्या दाखविण्यास सुरवात केली, व त्यांत यश येऊन कृष्णा नदी त्यांस त्याच ठिकाणीं ओलांडतां आली.

दुसऱ्या दिवशीं म्हणजे मंगळवारीं जानेवारी २३ सन १५६५रोजीं लढाईस तोंड लागलें. उभय सैन्याची रचना मोठ्या कौशल्यानें केली होती. रामरायानें आपल्या डावीकडील बगल आपला भाऊ तिरुमल याजकडे सोपविली होती; मध्यभागीं तर तो स्वतःच देखरेख करीत होता; आणि उजवीकडील बगलेचें आधिपत्य वेंकटाद्रि याजकडे सोपविलें होतें. मुसलमानी सैन्याच्या उजव्या बाजूस विजापूरचें सैन्य, मध्यभागीं निजामशहाचें आणि डावीकडे अहमदनगर आणि गोवळकोंडा येथील सुलतानांचें सैन्य होतें. मध्यभागीं असलेल्या निजामशहाच्या

सैन्यासमोर तोफखाना ठेवला होता. या तोफा तीन आडव्या रांगांनीं मांडल्या असून, अगदीं पुढच्या रांगेंत मोठमोठ्या व जड तोफा होत्या; व त्याच्या मागच्या बाजूस हलक्या चोहों बाजूस फिरवतां येणाऱ्या जेजाला ठेवल्या होत्या. ही रचना शत्रूपासून लपविण्याकरितां दोन हजार परदेशी तिरंदाज या तोफांसमोर ठेवले होते. हिंदु सैन्य चाल करून आलें, तेव्हां त्यांनीं तिरंदाजीस सुरवात केली; आणि हिंदु सैन्य जवळ येऊन ठेपतांच ते एकदम मागे हटले व लागलीच तोफांची सरबत्ती करण्यांत आली. यामुळें हल्ला करून येणाऱ्या हिंदु सैन्याचें बरेंच नुकसान झालें व त्यास माघार घ्यावी लागली.

या वेळीं रामरायाचें वय ९६ वर्षांचे होतें. पण त्याच्या मनाचा उत्साह भरज्वानींत असलेल्या एखाद्या तरण्याबांड माणसाप्रमाणें होता. त्यानें पालखींत बसून आपल्या सैन्यावर देखरेख करण्याचें ठरविलें होतें. ही गोष्ट थोडी धोक्याची होती. कारण, अचानक हल्ला आल्यास पालखींत चटकन् माघार घेणें शक्य नव्हतें. ही गोष्ट त्याच्या सेनापतींनीं त्यास समजावून सांगितली व त्यास घोड्यावर बसण्याचा आग्रह केला. पण तो म्हणाला, "शत्रूची बिशाद ती काय! तीं मजसमोर पोरें आहेत. ते शौर्याचा मोठा आव घालतात. पण मी त्यांस तेव्हांच पळवून लावीन."

लढाईस सर्व बाजूंस तोंड जुंपलें, तेव्हां हिंदु सैन्यानें तोफांचा आणि बाणांचा नुसता वर्षाव केला. डाव्या आणि उजव्या बाजूस हातघाईची लढाई सुरू झाली. तिजमध्यें हिंदु सैन्याची मर्दुमकी दिसून आली आणि मुसलमानी फौजेस मागें हटावें लागलें. या सुमारास आपल्या सैन्यास उत्तेजित करण्याकरितां राम-राया पालखींतून उतरला आणि एका रत्नजडित सिंहासनावर बसला. मर्दुमकी गाजविणारांस इनामें देतां यावींत म्हणून त्यानें आपल्या

खजीनदारांस आपल्या सभोंवतीं द्रव्याच्या राशी ओतण्यास सांगितलें आणि जडजवाहीर व दागिनेहि आणून ठेवले. आणखी एक हल्ला शत्रूच्या मध्यभागावर चढविला कीं, मुसलमानी सैन्याची अगदीं दाणादाण उडेल असा या वेळेस सुमार दिसूं लागला होता. इतक्यांत एक अनपेक्षित प्रकार घडला. तांब्याच्या पैशांनीं भरलेल्या शत्रूंच्या तोफांची सरबत्ती एकदम उडविण्यांत आली, आणि सुमारें पांच हजार हिंदु सैनिक एका झटक्यासरशीं प्राणास मुकले. यामुळें हिंदु सैन्यांत मोठा घोटाळा उडाला. इतक्यांत मुसलमानांची पांच हजार स्वारांची एक तुकडी हिंदु सैन्याच्या मध्यभागावर चाल करून आली, आणि तिचा हल्ला थेट रामराया बसला होता त्या ठिकाणापर्यंत जाऊन पोहोंचला. या सुमारास रायानें आपली जागा बदलली होती व तो पुन्हां पालखींत आरूढ झाला होता. पण तो पालखींत बसतो न बसतो तोंच निजामशहाच्या सैन्यांतून सुटलेला एक मदोन्मत्त हत्ती या पालखीवर धावून आला आणि त्यामुळें भयभीत होऊन भोयांनीं आपली पालखी तेथेंच टाकली व ते पळत सुटले. रामराया या संकटांतून आपणांस वांचवून घोड्यावर बसण्याची तयारी करीत आहे तोंच शत्रूच्या सैनिकांनीं त्यास पकडलें व निजामशहाकडे नेलें. तेथें त्याचा लागलेच शिरच्छेद करण्यांत आला.

राजाचा अशा रीतीनें वध झालेला पाहून त्याच्या सैनिकांचा धीर खचला, व ते वाट फुटेल तिकडे पळूं लागले. या वेळीं हिंदु सैन्याची जी कत्तल झाली, तिजमध्यें एक लक्ष शिपाई गारद झाला असें म्हणतात. कृष्णानदीचा प्रवाह तर किती तरी अंतरापर्यंत सैनिकांच्या रक्तानें तांबडा लाल झाला होता. पण या कत्तलीपेक्षां हिंदुसैन्यांत माजलेला घोटाळा हा अधिक अनर्थावह होता. कारण सैन्याची शिस्त पुरी बिघडली नसती, तर तशा स्थितींतहि जमवा-

जमव करून राजधानीच्या संरक्षणाची कांहीं तजवीज करितां आली असती. पण तसें कांहीं एक न होतां, हिंदूंची राजधानी शत्रूच्या फौजेसमोर अगदीं उघडी पडली.

आपल्या सैन्यावर असा कांहीं अनर्थ कोसळला असेल, याची विजयनगरच्या शहरवासीयांस गंधवार्ता देखील नव्हती; व ती बातमी येऊन थडकली तेव्हां त्यांस खरी देखील वाटेना. कारण, त्यांचे सेनापती मोठमोठीं सैन्यें आपल्यासमवेत घेऊन गेले होते, आणि विजयाची तर त्यांस अगदीं खात्री वाटत होती. पण इतक्यांत, आपल्या सैन्याचा पराभव झाला, मुख्यमुख्य सरदार मारले गेले आणि सर्व सैन्यानें पळ काढिला, ही बातमी येऊन थडकली. पण हा पराभव केवढा भयंकर होता, याची अझून देखील लोकांस कल्पना झाली नव्हती. पूर्वीच्या सर्व प्रसंगीं शत्रूंस माघार घ्यावी लागली, किंवा मोठमोठ्या खंडण्या देऊन त्यांस परत पाठविण्यांत आलें. कसेंहि झालें तरी शहरच्या तटबंदीच्या आंत आजपर्यंत शत्रूचा केव्हांहि रिघाव झाला नव्हता. या प्रसंगीं देखील असेंच कांहीं तरी घडेल, अशी त्यांची अपेक्षा होती. म्हणून त्यांच्या मतें निदान शहरास तरी कांहीं धोका नव्हता.

पण थोडक्याच वेळांत त्यांच्या भ्रमाचा निरास झाला. कारण सैन्यांतील परास्त झालेले शिपाई तेथें येऊन थडकले. त्यांच्या अग्रभागीं मोठमोठे सरदार आणि राजघराण्यांतील कांहीं पुरुष होते. या राजपुरुषांनीं शहरच्या बंदोबस्ताची कांहींएक तजवीज न करितां, थोडक्याच वेळांत जितकें जडजवाहीर बरोबर घेतां येईल तितकें घेऊन व तें हत्तीवर लादून शहरांतून पळ काढला.

आतां मात्र शहरांतील लोकांस वस्तुस्थिति समजली आणि त्यांच्या मनावर भीतीचा पगडा बसला. तो कांहीं साधा पराभव नसून अन-

र्थांचा मूर्तिमंत डोंगर त्यांच्यावर आतां कोसळला होता. झालें सर्व, आशा मावळली. शहरांतील असंख्य रहिवाशी असहाय व उघडे पडले. शत्रूपासून पळून जाणें देखील त्यांस शक्य नव्हतें. कारण गाड्या, घोडे आणि बैल हे सर्व सैन्याच्या बंदोबस्तासाठीं निघून गेले होते. असेल ती संपत्ति जमिनींत पुरून ठेवणें, याखेरीज दुसरा मार्ग नव्हता. पण तें करण्यासहि त्यांस सवड मिळाली नाहीं. कारण, पराभवाच्या दुसऱ्याच दिवशीं दरवडेखोरांनीं लुटालूट करण्यास सुरवात केली. या एकाच दिवसांत त्यांनीं शहरवासीयांवर सहा वेळां मोठे निकराचे हल्ले चढविले असें म्हणतात.

लढाईच्या तिसऱ्या दिवशीं तर शहरवासीयांच्या दुर्दैवाचा कळस झाला. मुसलमानांच्या विजयी सैन्यानें रणांगणावर विजयोत्सव करण्यांत दोन दिवस घालवून तें तिसऱ्या दिवशीं विजयनगर येथें येऊन पोहोंचलें. या दिवसापासून ते पुढील पांच महिनेपावेतों विजयनगर येथें एकसारखी लुटालूट चालली होती. शत्रु सर्वनाश करण्याकरितां आला होता, व तें काम त्यानें अगदीं निर्दयतेनें बजाविलें. त्यानें लोकांची निष्ठुरपणें कत्तल केली. राजवाडे आणि देवालयें जमीनदोस्त केलीं. नरसिंहाचा एक अजस्र दगडी पुतळा होता, त्याची देखील त्यानें नासधूस केली. कोणतीहि गोष्ट त्याच्या तडाक्यांतून वांचली नाहीं. ज्या सभामंडपांतून विजयनगरचे राजे उत्सवाची पाहणी करित तो देखील त्यानें पाडून टाकला, आणि तेथील सुंदर खोदकामाचा विध्वंस केला. विठ्ठलस्वामीच्या भव्य व सुशोभित मंदिरास तर त्यानें आग लाविली व तेथील दगडावर केलेलें खोदकाम फोडून टाकिलें. तलवार, कुऱ्हाड आणि अग्नि, यांच्या योगानें जें कांहीं नुकसान त्यास करवेल तें सर्व त्यानें केलें. जगाच्या इतिहासांत एवढ्या भव्य शहरावर, इतक्या अल्प अवकाशांत, असा भयंकर प्रसंग कधींहि गुदरला नाहीं.

वाचकहो, आमची गोष्ट येथेंच संपते. ती रम्य नगरी, ते मोठे नृपति, आणि त्या नृपतीसभोंवतीं असणारा सामन्तराजांचा समुदाय, या सर्व गोष्टी आतां नामशेष झाल्या आहेत. मुसलमानांच्या तडाक्यांतून वांचलेल्या पडक्या इमारती, मोडकीं देवालयें आणि इतस्ततः कोठें तरी शिल्लक राहिलेले प्राकार, हेच काय ते विजयनगरच्या गत वैभवाचे अवशेष आतां शिल्लक राहिले आहेत. नाहीं म्हणावयास आणखी एक शिल्लक राहिलेली वस्तु म्हणजे विजयनगरच्या सम्राटांनीं आपल्या नगरीस रमणीयता आणण्याकरितां बांधलेले कालवे आणि पाटबंधारे, हे होत. विजयनगरच्या गजबजलेल्या शहरवस्तीच्या ठिकाणीं आतां कांहीं लहानसहान खेडीं मात्र दिसून येतात, आणि या कालव्यांचा तेथील शेतकऱ्यांस उसाची आणि भाताची लागवड करण्याच्या कामीं उपयोग होत असतो. याच ठिकाणीं मागील काळांत आपल्या पूर्वजांचें एक बलाढ्य साम्राज्य होऊन गेलें, याची जाणीव या शेतकऱ्यांस कितपत असेल, हें कोणीं सांगावें?

समाप्त.